श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक जानेवारी-

# श्री साईलीला

संपादक : द. म. सुकथनकर
कार्यकारी संपादक : विद्याधर ताठे

अमृत महोत्सवी वर्ष



श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक
जानेवारी-फेब्रुवारी, १९९८

# श्री साईलीला

संपादक : द. म. सुकथनकर
कार्यकारी संपादक : विद्याधर ताठे

अमृत महोत्सवी वर्ष

रु. ८



# पुण्यतिथी उत्सव - छायाचित्रे



दसरा उत्सवातील पारंपारिक क्षण :
श्रींचा फोटो, पोथी व वीणा मिरवणूक



उत्सवासाठी जमलेला साईभक्तांचा मेळावा



उत्सवात श्रींच्या पादुकांची पूजा करताना
विश्वस्त श्री. कारखानीस व श्री. गर्दे पाटील




उत्सवातील रात्रीच्या कार्यक्रमात साईभक्तांपुढे गाताना
गायक श्री. रूपसिंग राठोड



दसरा उत्सवातील एक विशेष पूजा :
श्रीसाई आराधना करताना विश्वस्त श्री. व सौ. जयकर
आणि श्री. व सौ. सोनी

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे
अधिकृत नियतकालिक

**श्री साईलीला**

वर्ष ७५

जानेवारी-फेब्रुवारी १९९८

: संपादक :
**द. म. सुकथनकर**

: कार्यकारी संपादक :
**विद्याधर ताठे**

**: कार्यालय :**
'साईनिकेतन',
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.
दूरध्वनी. : ४१६ ६५ ५६
फॅक्स : (०२२) ४१५ ०७९८

: मुद्रक :
**गीता ऑफसेट, मुंबई.**

: टाईपसेटींग :
**देवयानी एन्टरप्रायझेस, मुंबई.**

वार्षिक वर्गणी : रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी : रु. १०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी :
रु. १०००/-
(टपाल खर्चासहित)
अंकाची किंमत : रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान शिरडी यांनी हे नियकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - १४ येथे छापून प्रसिद्ध केले.

या नियतकालिकातील लेखात प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# अमृतमहोत्सवी वर्ष

(१९९७-९८)



महाशिवरात्र विशेष

## अंतरंग


- ❑ **संपादकीय** : विद्याधर ताठे — २
- ❑ **साईबाबांचे अध्यात्मिक दर्शन** : सी. वाय. कुलकर्णी — ३
- ❑ **साई अनुभव** — १२
- ❑ **साई वंदना** (कविता भक्तीगीते) — १३
- ❑ **बोधकथा** : ह. ल. रानडे — १५
- ❑ **संसाराची साल** : शाम जुवळे — १७
- ❑ **गंगासागर यात्रेचे महात्म्य** : (संकलन) — २१
- ❑ **ग्रंथपरिचय** : विद्यानंद — २३
- ❑ **नामाच्या संगती** : भालचंद्र गन्द्रे — २४
- ❑ **साईकिमया** — २६
- ❑ **असे भक्त अशी भक्ती** — २८
- ❑ **भक्तीचे महात्म्य** : वसंत दळवी — २९
- ❑ **अमृतकलश** : (जुन्या साईलीलातील शब्दधन) — ३८
- ❑ **महाशिवरात्र विशेष : सोरटीचा सोमनाथ** — ४२
- ❑ **पुण्यस्मरण : शेगांवचे गजानन महाराज** — ४३
- ❑ **अभिप्राय** — ४५
- ❑ **आवाहन** — ४६
- ❑ **संस्थान प्रकाशित ग्रंथांची सूची** — ४७


卐卐卐

# संपादकीय

विद्याधर ताठे



**शिरडीस ज्याचे लागतील पाय।**
**टळती अपाय सर्व त्याचे ॥**
**माझ्या समाधीची पायरी चढेल।**
**दुःख हे हरेल सर्व त्यांचे ॥**

'**श्री** साईलीला'च्या वाचकांना मकर संक्रातीच्या सहर्ष शुभेच्छा देऊन मी नववर्षातील या पहिल्या अंकाच्या संपादकीयाचा श्रीगणेशा करीत आहे. १९९७ ची सांगता व नववर्षाचा शुभारंभ शिर्डी येथे बाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन करणाऱ्या भक्तांची संख्या दरवर्षी वाढत आहे. याखेपेसही दि. २० डिसेंबर ९७ पासून तब्बल १० जानेवारी ९८ पर्यंत साईभक्तांचा शिर्डीत महासागर पसरलेला होता. साईभक्तीचा हा वाढता प्रचार-प्रसार फार मोठे शुभसंकेताचे लक्षण आहे. कारण आधुनिक विज्ञानयुगामध्ये, सर्व मानवजातीमध्ये स्नेहाचे-सौहार्दाचे-सामंजस्याचे वातावरण निर्माण होण्याची फार मोठी गरज असून पंथ-संप्रदायांचा संकुचितपणा दूर सारून आपण सर्वांनी मानवधर्माचे पाईक होणे अगत्याचे आहे. श्रीसाईबाबा मानवधर्माचे संस्थापक आहेत, प्रचारक आहेत. त्यांच्या भक्तीद्वारे भक्ताच्या मनातील अंधकार दूर होवो व कालसापेक्ष मानवधर्माची ज्योत प्रज्वलित होवो ही अपेक्षा आहे.

श्रीसाईलीलाच्या प्रस्तुतच्या 'जानेवारी-फेब्रुवारी ९८' अंकातील श्री. ह. ल. रानडे यांची बोधकथा व श्री. जुवळे यांचे संसाराची साल हे चिंतन सर्वांना आवडेल असा विश्वास आहे. त्याशिवाय श्री. गंद्रे यांच्या नामाच्या संगती, श्री. वसंत दळवी यांचा भक्ती आणि प्राचार्य कुळकर्णी यांचा बाबांचे आध्यात्मिक दर्शन हे लेख वाचकांना वाचनाचे समाधान देणारे ठरावेत.


संक्रांतीचे महापर्व भारतीय जनमनात आगळे वेगळे महत्त्वाचे आहे. संक्रांतीच्या पर्वकाळी गंगासागर येथे होणाऱ्या महायात्रेला प्राचीन महत्त्व आहे हे लक्षात घेऊन आम्ही गंगासागर यात्रेचे महात्म्य या अंकात दिलेले आहे. वाचकांनी-लेखकांनी अशा ठिकठिकाणच्या सर्व यात्रांचा साद्यंत वृत्तांत द्यावा-लेख लिहावेत. व श्रीसाईलीलाकडे पाठवावेत. गेल्या दसरा अंकात आम्ही मक्का-मदिना यात्रेवरील डॉ. यु. म. पठाण यांचा लेख दिला होता. जैनांच्या पालिताना, शिखरजी, बौद्धांच्या बोधगया-सांचीस्तूप, आदी तीर्थस्थानांबद्दल-यात्रांबद्दलही खूप लिहीण्यासारखे आहे. 'यात्रा हे साधुत्व-संतत्व-सत्प्रवृत्ती वृद्धिंगत करणारे, माणसांना एकमेकांच्या अधिक जवळ आणणारे साधन आहे. केवळ कर्मकांड म्हणून यात्रेकडे न पाहता आपण त्यामागील उदात्त हेतू समजून घेतला पाहिजे. या अंकात गंगासागर यात्रेबद्दल लेख छापण्यामागे हाच उदात्त हेतू आमच्या मनात आहे. नेहमीप्रमाणे साईअनुभव साईवंदना हा मजकूर आहेच पण तो अपेक्षेएवढा वाढण्याच्या दृष्टीने भक्तांनी आपले अनुभव आमच्याकडे मोठ्या संख्येने पाठविण्याची गरज आहे. आज आमच्याकडे जे थोडे फार अनुभव येतात. ते नीट लिहिलेले नसतात व त्यातून अंधश्रद्धेलाच खतपाणी मिळेल की काय असे वाटते. तरी भक्तांनी आपले अनुभव सुवाच्चपणे कागदाच्या एकाच बाजूस लिहून वा टाईप करून आमच्याकडे पाठवावेत त्यांचे सहर्ष स्वागत आहे. आपण विज्ञानयुगात आहोत याचे नेमके भान ठेवून हे अनुभव लेखन असावे एवढीच नम्र विनंती.

संक्रांत महापर्वाच्या पुनःश्च शुभेच्छा !

**विद्याधर ताठे**
कार्यकारी संपादक, श्री साईलीला

# श्री साईबाबांचे अध्यात्मिक दर्शन

– प्राचार्य सी.वाय. कुळकर्णी



श्री साईबाबा मानवदेहधारी असतांना त्यांचे दर्शन घेण्याचे महत्भाग्य लाखो साईभक्तांना लाभलेले आहे. साईबाबांच्या देहत्यागानंतरदेखील अनेक भक्तांनी जागृत, निद्रित्थ, ध्यानस्थ, किंवा समाधीस्त असतांना साईबाबांचे मानवदेहरुपात दर्शन घेतलेले आहे. साईभक्त साईमंदिरात जाऊन नेहमीच साईबाबांच्या मूर्तीच्या माध्यमातून त्यांचे मानवदेहरुपात दर्शन घेत असतात. परंतु साईभक्तांनी केवळ देहरुपात साईबाबांचे दर्शन घेण्यात समाधान किंवा कृतार्थता न मानता मानवदेहातीत असलेले साईबाबांचे अध्यात्मिक दर्शन घेण्याचा प्रयत्न करायला हवा. साईबाबांचे आध्यात्मिक दर्शन घेण्यासाठी आवश्यकता आहे ती फक्त मनन, चिंतन आणि ग्रहणशील चित्ताने साईचरित्राचे अनुध्यान करण्याची. एक साईभक्त ह्या नात्याने साईबाबांचे आध्यात्मिक दर्शन घेण्याचा प्रयत्न मी माझ्या अल्पकुवतीनुसार नेहमीच करीत असतो. मला झालेल्या साईबाबांच्या आध्यात्मिक दर्शनाचे विविध पैलू मी ह्या लेखात माझ्या साईभक्त बंधूभगिनींकडून मला मार्गदर्शन मिळावे व मला साईबाबांचे आध्यात्मिक दर्शन अधिक व्यापकस्वरुपात घेता यावे म्हणून अतिशय नम्रपणे सादर करीत आहे.

साईबाबांच्या आध्यात्मिक दर्शनाचा शुभारंभ त्यांच्या जन्मरहस्यापासूनच होतो अशी माझी धारणा आहे. साईबाबांना

त्यांच्या एका भक्ताने प्रश्न विचारला होता की बाबा आपले माता-पिता कोण होते ? ह्यावर साईबाबांनी उत्तर दिले की ब्रह्म माझा पिता आणि माया माझी माता. ह्या उत्तराचा अर्थ असा होतो की स्त्री-पुरुषापासून किंवा स्त्री-पुरुषामुळे साईबाबांचा जन्म झाला नव्हता. साईबाबा अयोनीज होते आणि अयोनीज असणे हिंदू धर्माप्रमाणे असंभव नाही. ईश्वराचे अनेक अवतार अयोनीज होते. सर्व नवनाथ अयोनीज होते. साईबाबा अयोनीज होते कारण ते साक्षात परब्रह्माचा अंश होते. एकदा एका भक्ताने साईबाबांना त्यांचे वय किती आहे हा प्रश्न विचारला असता साईबाबांनी उत्तर दिले होते की ''माझे वय लाखो वर्षांचे आहे.'' साईबाबांच्या ह्या उत्तराचा मतीतार्थ असा आहे की साईबाबांना वय नव्हते. साईबाबा म्हणजे प्रत्यक्ष परब्रह्म आणि परब्रह्माला वय नसते. परब्रह्म कधीही अस्तित्वात आलेले नसते. कारण ते केव्हाही अस्तित्वातच असते.

अध्यात्मात प्रगती करून अत्युच्च पातळीवर जाण्यासाठी साधनेची अत्यंत आवश्यकता असते हे महत्त्वाचे तत्व साईबाबा स्वतः साधना करून आपल्या भक्तांना समजावून देत असत. शिर्डीत आगमन केल्यानंतर सुरवातीला साईबाबांचा बराच वेळ रानावनात भटकण्यात जात असे. ते रानात काटेरी झुडुपांमध्ये शिरून किंवा निंबवृक्षासमोरील लेंडीबागेत म्हणजे सुरवातीला असलेल्या फड्या निवडुंगाच्या जाळ्यांमध्ये शिरून ध्यानधारणा करीत असत. द्वारकामाईत असनस्थ असतांनादेखील अनेकवेळा ते कठड्याला हात टेकून तासनतास शून्यात पहात बसलेले असायचे. हादेखील साधना करण्याचाच प्रकार होता. द्वारकामाईत होणाऱ्या भक्तांच्या गर्दीमुळे साईबाबांच्या साधनेत अडथळा येत असे आणि म्हणूनच हे लेंडीबागेत जात असत.

साईबाबा साधनेच्या बाबतीत इतके जागृत असत की त्यांच्या साधनेत अडथळा आणू शकेल असे व इतके अन्नदेखील ते भक्षण करीत नसत. साधनेमुळे साईबाबांना सत्स्वरुप परब्रह्माचा आतून, म्हणजेच चित्तातूर प्रत्यय येत असे आणि ह्या प्रत्ययात व्यत्यय येऊ नये, ह्या प्रत्ययात अधिकाधिक गढून जाता यावे म्हणून लोकसंग टाळण्यासाठी ते निर्जन, निवांत, एकांत स्थानी जात असत असे विधान केल्यास चूक ठरणार नाही. अध्यात्म क्षेत्रात अत्युच्च स्थानावर पोहोचलेल्या सिद्ध पुरुषाची ज्ञानसाधना अखंडपणे सुरु असते. साईबाबांची साधनादेखील दिवस-रात्र ते जागृतावस्थेत असतांना आणि निद्राधीन असतांनादेखील चालत असे. ते सतत ध्यानयोगावर असायचे म्हणूनच अनेकदा ते बोलत असतांना मध्येच थांबत असत. नामस्मरण हे अध्यात्म साधनेतील अत्यंत परिणामकारक साधन आहे. साईबाबा ह्या साधनाचा उपयोग सतत करीत असत. साईबाबांचे सतत नामस्मरण चाललेले असायचे. परंतु ते वैखरी, मध्यमा किंवा पश्यंती ह्या तीन प्रकारच्या वाणींच्या पलीकडे असलेल्या परा वाणीत चालत असे. साईबाबांच्या अंतःकरणात स्फूरणरुपात हे नामस्मरण दिन-रात अखंडपणे, अव्याहतपणे चालू असे. साईबाबांच्या केवळ हृदयातूनच नव्हे तर प्रत्येक अवयवातून अखंडपणे नामस्मरणाचा ध्वनी निघत असे. त्यांचा एकदेखील श्वास नामस्मरणाशिवाय घेतला जात नसे. साईबाबांच्या देहाच्या प्रत्येक अणू-रेणूंतून सतत नामस्मरणाचा ध्वनी येत असे. योगशास्त्रामधे याला ''अनाहत'' नाद म्हणतात. साईबाबांच्या बाबतीत हा अनाहत नाद स्वच्छपणे ऐकू येत असे आणि साईभक्त म्हाळसापतींनी हा अनाहत नाद साईबाबा निद्रिस्थ झाल्यावर त्यांच्या हृदयावर हात ठेवून ऐकला होता. साधनेसाठी आवश्यक असलेली मनाची एकाग्रता साईबाबांना लाभलेली होती. साईबाबांनी आपल्या सर्व क्रिया मर्यादीत ठेवल्या होत्या. इंद्रियांवर नियंत्रण ठेवले होते. इंद्रियांच्या क्रियांमधील अतिरेक टाळला होता. आचरणामध्ये कमालीचा नियमितपणा आणला होता. साधनेसाठी आवश्यक असलेली समदृष्टी, शुभदृष्टी त्यांनी राखली होती. संपूर्ण सृष्टीच त्यांना मंगल वाटत असे.

आध्यात्मिक उन्नत्तीसाठी आवश्यक असलेली साधना ही सद्गुरुंच्या मार्गदर्शनाखाली करायची असते. साहजिकच एकाग्रतेसाठी आवश्यक असलेली जीवनाची अध्यात्मामध्ये सद्गुरुंना अनन्यसाधारण महत्त्व आहे. सद्गुरु हेच मार्गदर्शक असून सद्गुरुकृपेचा लाभ झाल्याशिवाय अध्यात्मातील विलक्षण अनुभव येणे जवळ जवळ अशक्यच आहे. साईबाबांनी निंब वृक्षाखाली बारा वर्ष आपल्या गुरुंच्या मार्गदर्शनाखाली खडतर साधना केली होती हे साईभक्तांना माहीतच आहे. साईबाबांना गुरुकृपेचा लाभ झाला होता. साईबाबांवर त्यांच्या सद्गुरुचा सदैव वरदहस्त होता. साईबाबा म्हणायचे की केवळ गुरुकृपेमुळेच ते भक्तांच्या उद्धाराचे कार्य करू शकतात. साईबाबा सांगायचे की त्यांच्या गुरुंनी दोन रुपये दक्षिणा मागितली होती आणि साईबाबांनी श्रद्धा आणि सबुरीच्या रुपात आपल्या गुरुंना दोन रुपये दक्षिणा दिली होती. साईबाबांची त्यांच्या गुरुवर नितांत श्रद्धा होती. साईबाबांना सद्गुरु होते आणि स्वतः साईबाबा त्यांच्या भक्तांचे सद्गुरु होते. साईबाबा सद्गुरु होते म्हणूनच ते आपल्या भक्तांना आध्यात्मिक प्रगती करून ''सत्वस्तु'' म्हणजेच परब्रह्माची अनुभूती मिळवून देण्यास सदैव सक्रिय असत. मी कोण आहे ? ह्या प्रश्नाचा प्रत्येकाने विचार



करावा व त्याचे उत्तर शोधून काढावे असा आपल्या भक्तांना साईबाबा नेहमीच आग्रह करीत असत. सद्गुरू साईबाबा त्यांच्या भक्तांची आध्यात्मिक पातळी ओळखून त्यांना प्रपंचात अडकून राहू द्यायचे की नाही हे स्वतः ठरवीत असत. आपल्या ज्या भक्तांचे अंतःकरण अजून शुद्ध झालेले नाही. अशांना प्रपंचात राहून कर्मयोगाचे आचरण करण्याचा सल्ला देत. परंतु ज्यांचे अंतःकरण शुद्ध झालेले आहे अशांना मात्र ते कर्मयोग सोडून ज्ञानयोग आचरण करण्यास सांगत असत. म्हणूनच त्यांनी दासगणूंना पोलीसखात्यातील नोकरी सोडावयास सांगितली व दाभोलकरांना निवृत्तीनंतर दुसरी नोकरी शोधण्याचे प्रयत्न सोडून द्यावेत असा सल्ला दिला. सद्गुरु साईबाबा भक्तांच्या मनात आपल्याबद्दल किती श्रद्धा आहे, त्यांच्या मनात लोभ-मोह, भूतदया किती आहे याची सत्वपरीक्षादेखील घेत असत.

चित्रशुद्धी किंवा आत्मशुद्धी हे आध्यात्मिक प्रगतीचे एक अत्यंत विश्वसनीय लक्षण आहे. साईबाबांचे अंतःकरण शुद्ध होते. आसक्ती, शोक, मोह अविवेक त्यांच्यापाशी मुळीच नव्हता. ते चित्रशुद्धीजन्य आध्यात्मिक उन्नतीच्या अंतीम स्थरावर पोहोचलेले होते. साईबाबांना स्वतःचे आत व बाहेर परब्रह्मच प्रत्ययास येत असल्यामुळे त्यांच्या बाबतीत चित्राला कलुषित करणाऱ्या प्रेरणा पूर्णपणे लयास गेल्या होत्या. म्हणूनच त्यांचे चित्र सदैव प्रसन्न असे. ते प्रसन्नात्मा झाले होते. साईबाबा अनेक प्रकारे आपल्या भक्तांचे मन शुद्ध करण्याचा प्रयत्न करीत असत. ते आपल्या भक्तांना मन शुद्ध करून देहातील असलेल्या आत्मज्ञानाकडे लक्ष वळविण्यास सांगत असत. आपल्या भक्तांची चित्तशुद्धी करून त्यांचा आध्यात्मिक प्रगतीचा मार्ग खुला करण्यासाठी साईबाबा भक्तांकडे दक्षिणा मागत. भक्तांकडे दक्षिणा मागण्यामागे निश्चितच आध्यात्मिक संदर्भ होता. ज्यांच्या मनात धन - सपत्ती बद्दल मोह नसतो तोच दक्षिणा देतो. तेव्हा साईबाबा भक्तांकडे दक्षिणा मागून त्यांच्या मनात मोह-लोभ किती शिल्लक आहे हे तपासून पहात असत. दान करण्याची वृत्ती वाढत गेल्यावर संसारातील आसक्ती कमी होत जाते व आध्यात्मिक

प्रगतीचा मार्ग सुकर होतो. कधीकधी साईबाबा आपल्या भक्तांकडून आध्यात्मिक स्वरुपाची दक्षिणादेखील मागून घेत असत. एकदा साईबाबांनी सौ. राधाबाई तर्खड ह्या आपल्या भक्ताकडे सहा रुपये दक्षिणा मागितली. परंतु राधाबाईकडे व त्यांच्या पतीकडेदेखील इतकी रक्कम नव्हती. आपण साईबाबांना दक्षिणा देऊ शकत नाही ह्या विचाराने राधाबाई खीन्न झाल्या. आपल्या पत्नीची समजूत काढण्यासाठी श्री. तर्खड साधाबाईना म्हणाले की साईबाबांनी सहा रुपये दक्षिणा मागून तुला असे सुचविले की, तू षडरिपूंचा त्याग कर. तर्खडांनी सांगितलेला सहा रुपये दक्षिणेचा हा आध्यात्मिक अर्थ राधाबाईना पटला आणि साईबाबांनीदेखील तो अर्थ मान्य करुन पुन्हा त्यांच्याकडे दक्षिणा मागितली नाही.

एकदा साईबाबांनी काकासाहेब दीक्षितांकडे एका व्यक्तीला पाठवून १००/- रुपये दक्षिणा मागितली. त्या काळी १०० रुपये ही मोठी रक्कम होती. काकासाहेबांकडे इतकी मोठी रक्कम असणे शक्य नाही हे अंतर्ज्ञानी साईबाबांना माहीत असणारच. असे असून देखील साईबाबांनी १०० रुपये दक्षिणा का मागितली असावी असा प्रश्न उपस्थित होतो.

माझ्या समजुतीनुसार १०० रुपये दक्षिणेतील एक हा आकडा सतत, म्हणजेच परब्रह्माचे प्रतीक आहे. दोन शून्यांपैकी एक शून्य हे नाम व दुसरे शून्य हे ''रुप'' ह्या दोन ''असत''चे प्रतीक आहेत. तेव्हा तू नामरुपाच्या शून्यांमध्ये अडकून न राहता एकमेव अद्वितीय सत चे अस्तित्व जाणण्याचा प्रयत्न करीत. रहा असे साईबाबांनी सुचविले होते. शंभर रुपये दक्षिणेचा आणखी एक आध्यात्मिक मतीतार्थ असा होतो की एक हा आकडा आत्माचे प्रतीक आहे व दोन शून्य हे स्थूल देह आणि सूक्ष्म देह यांचे प्रतीक आहेत. साईबाबा दीक्षितांकडे शंभर रुपये दक्षिणा मागून त्यांना सुचवू इच्छित होते की तू केवळ तुझ्या स्थूल आणि सूक्ष्म ह्या शून्य किंमत असलेल्या देहांनी माझी भक्ती करू नकोस तर तू तुझाआत्मा देखील माझ्या भक्तीरसात विरघळू दे, तरच तुझी परब्रह्माशी गाठ पडू शकेल.

भक्तांनी साईबाबांना नमस्कार केला की साईबाबा त्यांना ''अल्ला भला करेगा'' असा आशिर्वाद देत असत. निर्गुण परमेश्वराखेरीज जगात काहीही नाही ज्ञान, कर्म, ज्ञाता, कर्ता-करविता फलदाता तोच आहे हे भक्तिमार्गाचे तत्व साईबाबांना पूर्णपणे समजलेले असल्यामुळे ते ''अल्ला भला करेगा'' असा आशीर्वाद द्यायचे. साईबाबा स्वतःला यंत्र आणि अल्लाला, म्हणजेच निर्गुण परब्रह्माला यांत्री समजत असत. मी निमित्तमात्र, असून केवळ अल्लाच्या कृपेनेच भक्तांवरील संकटे दूर होतात अशी साईबाबांची धारणा होती आणि ह्या धारणेनेच ते भक्तांच्या उद्धाराचे दिव्य कर्म करीत असत. यंत्र-यांत्री या धारणेने कर्म करणे यालाच बोधयुक्त कर्म करणे किंवा कर्मबोध होणे असे म्हणतात. साईबाबांना हा कर्मबोध झालेला होता. ह्या कर्मबोधामुळेच ते स्वतःला ''अनलहक्क म्हणजे मी स्वतः परमेश्वर आहे न म्हणता ''यादे हक्क'' म्हणजे मी परमेश्वराचा बंदासेवक आहे असे म्हणत असत. साईबाबा त्यांच्या व्याधीग्रस्त भक्तांना व्याधीमुक्त करायचे परंतु त्यांना व्याधीमुक्त करण्याचे श्रेय ते कधीच स्वतःकडे न घेता ''अल्ला फार दयाळू आहे. अल्ला तुला निश्चित बरे करील'' अशा शब्दांमध्ये व्याधीग्रस्तांना धीर द्यायचे.

भक्तांने साईबाबांना नमस्कार केल्यावर साईबाबा आशीर्वाद देऊन त्या भक्तांच्या कळपाला त्यांच्या अहर्निश प्रज्वलित असलेल्या धुनीतून काढून ठेवलेली उदी लावायचे आणि थोडी उदी प्रसाद म्हणूनदेखील द्यायचे. साईबाबांच्या धुनीला आणि उदीलादेखील महद आध्यात्मिक अर्थ आहे. आपल्या सतत पेटणाऱ्या धुनीद्वारे साईबाबा आपल्या भक्तांना सुचवू इच्छित होते की भक्तांनो तुमच्या जीवनात त्यागरुपी धूनी सतत प्रज्वलित असू द्या. ह्या त्यागरूपी धुनीमध्ये तुमचे सर्व मनोविकार जाळून टाका, म्हणजे तुमचे मन लालभडक रखरखीत निखाऱ्याप्रमाणे शुद्ध होईल. हळूहळू तुमच्या शुद्ध मनरुपी निखाऱ्याचे रुपांतर वैराग्यरुपी राखेत होईल आणि ह्या वैराग्यरुपी राखेचे अस्तित्व संपून तुमचे मन आत्मबोधात कधी विलीन झाले हे तुम्हांला कळणारदेखील नाही. साईबाबा आपल्या भक्तांना उदीचा, म्हणजेच राखेचा टीळा लावून व प्रसाद देऊन भक्तांना आध्यात्मिक संदेश देऊ इच्छित होते की भक्तांनो देहाच्या मोहात अडकून पडू नका, कारण शेवटी देहाची राखच होणार आहे. सबब देहाचे अती लाड करू नका. देह हे परब्रह्माची अनुभूती घेण्याचे साधन आहे. साधन म्हणून देहाची आवश्यक तेवढी काळजी घ्या, परंतु ह्या देहाचे गुलाम होऊ नका, मी म्हणजे देह नाही हे समजून घ्या.

कधी कधी साईबाबा भक्तांना एखादी गोष्ट सांगत असत किंवा एखाद्या प्रसंगाचे वर्णन करीत असत. परंतु वरवर पाहता साधी गोष्ट किंवा प्रसंगवर्णन वाटणाऱ्या साईबाबांच्या वक्तृत्वामध्येदेखील फार मोठे आध्यात्मिक तत्व दडलेले असे. एकदा पाटणकर नावाच्या गृहस्थांनी साईबाबांना अतिशय नम्रपणे विनंती केली की बाबा माझे मन स्थिर करण्याचा एखादा उपाय कृपा करून मला सांगा. ही विनंती ऐकून साईबाबा



पाटणकरांना सांगू लागले की एकदा इथे एक सौदागर आला होता. त्याच्याबरोबर एक घोडा होता. त्या घोड्याने नऊ लेंड्या घातल्या. सौदागराने त्या लेंड्या स्वतःच्या उपरण्यात बांधल्या. ह्यामुळे त्याचे चित्त एकाग्र झाले व त्याचे कार्य पुरे झाले. माझ्या अल्पमतीनुसार साईबाबांनी सांगितलेल्या ह्या प्रसंगाला किंवा गोष्टीला फार मोठा आध्यात्मिक अर्थ आहे.

सौदागर, घोडा, नऊ लेंड्या, व उपरणे ही प्रतीके वापरून साईबाबांनी पाटणकरांना आध्यात्मिक उपदेश केला होता. सौदागर म्हणजे मुमुक्षू. सौदागराला ज्याप्रमाणे व्यापार - व्यवसायात प्रगती करण्याची ओढ लागलेली असते त्याप्रमाणेच मुमुक्षूला आध्यात्मिक प्रगती करण्याचा ध्यास लागलेला असतो. घोडा म्हणजे आध्यात्मिक प्रगती करण्याचे भक्तिमार्ग हे साधन. नऊ लेंड्या म्हणजे भक्तीची नवविधा लक्षणे म्हणजेच भक्ती करण्याचे नऊ प्रकार आणि उपरणे म्हणजे आचरण. साईबाबा पाटणकरांना सांगू इच्छित होते की मुमुक्षू नऊ प्रकारे भक्तिमार्गाचे आचरण करावे, म्हणजे त्याचे मन स्थीर होते व अंती आत्मबोध होण्याचे त्याचे कार्य संपन्न होते.

आध्यात्मिक प्रगतीसाठी मनाची स्थीरता अतिशय आवश्यक आहे. भक्तांवर संकटे आल्यावर साईबाबा कधीकधी अस्वस्थ झालेले दिसत. कधी-कधी ते क्रोधीतदेखील होत असत. परंतु ह्या केवळ त्यांच्या गंभीर, शांत मनाच्या महासागरावर उठलेल्या क्षणभंगूर लाटा होत्या लाटांमुळे महासागराची शांती भंग पावत नाही. त्याचप्रमाणे अस्वस्थता व क्रोध हे साईबाबांच्या मनाची स्थीरता, अचलता भंग पावल्याचे द्योतक नव्हते. साईबाबांच्या स्थीर मनाने विशिष्ट प्रयोजनास्तव विशिष्ट उद्देशाने निर्माण केलेला तो आभास होता. साईबाबांचे मन निश्चितच अतिशय स्थीर होते. साईबाबांच्या मनाची स्थीरता किती उच्च कोटीची होती याचा प्रत्यय त्यांनी अतिशय शांतपणे देहत्याग करून आपल्या भक्तांना दिलेलाच आहे. साईबाबा आपल्या आध्यात्मिक प्रगती करु इच्छिणाऱ्या भक्तांनादेखील सदैव देत असत. जर एखाद्या भक्ताचे मन अस्थीर झाले, विचलीत झाले, चंचल झाले तर साईबाबा आपल्या भक्ताची ही समस्या ओळखून त्याला योग्य ते मार्गदर्शन करून मनाची स्थीरता परत मिळवून देण्यास सहाय्य करीत.

साईबाबा त्यांच्या मन स्थीर करण्याच्या प्रयत्नांत अयशस्वी झालेल्या भक्तांना दिलासा देत असत की ब्रह्मदेवाने निर्माण केलेल्या ह्या सृष्टीतील सौंदर्याचा आस्वाद घेणे हे दृष्टीचे काम आहे. दृष्टीचे काम दृष्टीला करुन द्यावे. परंतु सौंदर्यात आपले मन, चित्त गुंतू देऊ नये, चित्ताची अचलता ढळू देऊ नये. चित्त स्थीर होण्यास दीर्घ कालावधी लागतो. त्यासाठी दीर्घकाल

प्रामाणिकपणे प्रयत्न करावे लागतात. साईबाबांनी भक्तांना केलेला हा उपदेश म्हणजे त्यांच्या आध्यात्मिक प्रगतीची गुरुकिल्लीच आहे.

साईबाबांचे चित्त चैतन्यरुप बनून सदैव स्वस्वरुप रहात असे. ह्यामुळे अनेक बोलत वेळा साईबाबा अकस्मात बोलत असतांना मध्येच थांबत असत. अनाकलनीय हात वारे करीत असत. साईबाबा उन्मत अवस्थेत पोहचल्यामुळे ते वृत्तीरहित झाले होते. आणि म्हणूनच त्यांच्याबाबतीत वरील प्रकार घडत असे. ह्या अवस्थेत चित्तामध्ये भेदवृत्ती शिल्लक रहात नाही. ह्या अवस्थेला तुर्या असे म्हणतात. ही अवस्था प्राप्त झालेल्या साधकाला ब्रह्मविदरीष्ठ म्हणतात. साईबाबा ब्रम्हविदरीष्ठ होते आणि म्हणून त्यांचे मन उन्मत झाले होते. साईबाबा खऱ्या अर्थाने मुक्त झाले होते, ते जिवनमुक्त होते. जीवनमुक्त असल्यामुळे साईबाबांचे सुख कोणत्याही बाह्य क्रियेवर अवलंबून नव्हते. कोणतीही भोग्य वस्तू त्यांना मोहात पाडू शकत नव्हती. ते निर्मोही असल्यामुळे त्यांच्याकडे संग्रहाची वृत्ती नव्हती. त्यांना मिळणारी दक्षिणा ते रोजच्या रोज वाटून संपवीत असत. त्यांना भक्तांनी अर्पण केलेला नैवेद्य ते वाटून टाकत असत. त्यांना मिळालेली पुस्तके ते योग्य व्यक्तींना देत असत. प्रापचिक वा सांसारिक सुख-दुःखांची बाधा त्यांना कधीच होत नसे. त्यांची बुद्धी सम व निष्कांम होती. साईबाबा नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त व शांत ब्रह्म बनले होते. ते ब्रह्मीभूत झाले होते. ते खऱ्या अर्थाने ''र्निमम'' झाले होते. केवळ जीवनमक्त असल्यामुळे साईबाबा जगाच्या कल्याणासाठी झटत होते. त्यांच्या हातून कोणाचेही अकल्याण होईल असे कर्म कधीही होत नसे. मुक्तपुरुष असल्यामुळे साईबाबांकडे अमातित्व, अहंभीत्व, अहिंसा, आर्जव, इंद्रियनीग्रह हे दिव्य नैतीक गुण होते. त्यांची प्रत्येक कृती ही नीतीचा आदर्श होता. जीवन मुक्तावस्था ही मनाच्या निर्विषयतेची, सम व शुद्ध बुद्धीची आणि आध्यात्मिक उन्नतेची शेवटची पायरी आहे. उन्नतीची साईबाबांनी ही शेवटची पायरी ओलांडली होती. सर्वांभूती एक आत्मा हे साम्य ओळखले होते. त्यांच्या मनात मनुष्य आणि प्राणी हा भेदभाव नव्हता आणि ह्याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे जेव्हा साईबाबांनी निंबवृक्षाखाली उघड्यावर काही काळ वास्तव्य केल्यानंतर आपला मुक्काम द्वारकामाईत हलविला तेव्हा द्वारकामाई म्हणजे एक भग्न वास्तू होती जीला शिरडीचे रहिवाशी मशिद समजत असत. ही भग्न वास्तू कुत्रे, डुकर, साप, विंचू यांचे आश्रयस्थान होती. तरीसुद्धा साईबाबांनी ह्या वास्तुमध्येच राहणे पसंत केले होते. साईबाबांच्या द्वारकामाईत एका कटोऱ्यामध्ये साईबाबा न्याहारी करून उरलेले अन्न ठेवीत असत. हे अन्न भिकारी, फकीर त्याचप्रमाणे पक्षी, कुत्री व डुक्करदेखील खात असत. सर्वांभूती एकच आत्मा ह्या तत्वाचे पालन करण्याची साईबाबांची ही पद्धत खरोखरच अपवादात्मक होती.

सर्वांभूती एकच आत्मा ह्या अध्यात्मातील अत्यंत महत्त्वाच्या तत्वांचा आविष्कार म्हणूनच साईबाबांच्या मनात केवळ मानवाबद्दल नव्हे तर प्राण्याबद्दलदेखील अपार दया होती, भुतदया होती. साईबाबा खऱ्या ''मी''ला किंवा खऱ्या स्वतःला स्वतःत आणि इतरांत पहात असत. साईबाबांच्या ठाई सर्वजनीत प्रेम होते. साईबाबांचे सर्वजनीत प्रेम हे मानवप्रेमापेक्षा कितीतरी अधिक व्यापक होते. त्यांना मानव हा मानव आणि प्राणी हा प्राणी दिसत नव्हता तर दोन्हीही परब्रह्म दिसत होते. म्हणूनच त्यांच्या लेखी मानव व प्राणी हा भेद नव्हता, हे द्वैत नव्हते. आपल्या भक्तांनीदेखील सर्वांभूती एक आत्मा हे तत्व अंगिकारले आहे की नाही याची परीक्षा साईबाबा देहांतर करून, प्राण्यांचे देह धारण करुन घेत असत.

साईबाबांनी प्रभूशी एकता राखण्यासाठी (प्रभू हा शब्द ब्रह्म ह्या शब्दांऐवजी वापरलेला आहे) विषयांचा अंतर्बाह्य त्याग केला होता. ह्याचा अर्थ असा की केवळ शरीरानेच नव्हे तर मनानेदेखील त्यांनी सर्व विषय - वासनांचा त्याग केला होता. साईबाबा जाणून होते की देह हे ब्रम्हप्राप्तीचे साधन किंवा माध्यम किंवा उपकरण आहे. म्हणून देह टिकविण्यासाठी ते देहाच्या अगदी किमान गरजा भागवीत असत. वस्त्र म्हणून ते फक्त जुनी व फाटकी कफनी वापरीत असत. ते मीताहारी होते, म्हणजे फारच थोडा उपहार घेत असत. आवड किंवा चव ह्या गोष्टींच्या ते पलीकडे गेले होते. आणि याचा पुरावा म्हणजे ते भिक्षेमध्ये मिळालेले सर्व अन्न एकाच टमरेलात एकत्र कालवून सेवन करीत असत. साईबाबांनी परब्रह्माशी एकरुप होण्यासाठी केवळ जीवनावश्यक वस्तुंवरीलच नव्हे तर आपल्या देहावरील, आपल्या जीवनावरील ममतादेखील त्यागून दिली होती. म्हणूनच त्यांनी त्यांच्या वडारीण भक्तिणीच्या मुलाला पेटलेल्या भट्टीमध्ये पडू देण्यासाठी धुनीमध्ये हात घालून त्याला वरचेवर धरले व सुरक्षित ठिकाणी ठेवले. मात्र असे करतांना त्यांनी आपले हात भाजून घेतले. आपले भक्त खापर्डे यांच्या मुलाची प्लेगच्या व्याधीतून सुटका करण्यासाठी त्यांच्या प्लेगच्या लालभडक टरटरलेल्या गाठी आपल्या काखेत घेतल्या आणि दम्याची व्याधी असलेल्या हंसराजची दही खाण्याची वाईट सवय घालविण्यासाठी ते मांजरीचा देह धारण करून दही



खाण्यासाठी त्याच्या घरी गेले व चिडलेल्या हंसराजकडून पाठीवर काठीचे जोरदार फटके खाऊन आले. काही भक्तांच्या मते तात्या कोते पाटील ह्या आपल्या अनन्य भक्ताचे प्राण वाचविण्यासाठी साईबाबांनी त्यांचा मृत्यू स्वतःवर घेऊन देहत्याग केला.

साईबाबांमध्ये गीतेत सांगितलेल्या कर्मयोग, भक्तियोग आणि ज्ञानयोग ह्या परमेश्वरप्राप्तीच्या तिन्ही मार्गांचा सुरेख त्रिवेणी संगम झाला होता. परब्रह्मप्राप्तीचे हे तिन्ही मार्ग साईबाबा एकाच वेळी हाताळीत असत. साईबाबांनी विचार, भावना व इच्छाशक्ती या मनाच्या तिन्ही पैलूंद्वारे ब्रह्माशी किंवा आत्मरुपाशी तादात्म्य साधले होते. विचारातून किंवा ज्ञानातून ब्रह्माशी तादात्म्य पावणे म्हणजे ज्ञानयोग, भावनेतून वा भक्तीतून ब्रह्माशी तादात्म्य पावणे म्हणजे भक्तीयोग आणि ईच्छाशक्तीतून म्हणजेच कर्मातून ब्रह्माशी तादात्म्य पावणे म्हणजे कर्मयोग. साईबाबांनी हया तिन्ही प्रकारे ब्रह्माशी तादात्म्य साधले असल्यामुळे ते ज्ञानयोगी, कर्मयोगी आणि भक्तियोगी होते. साईबाबा भक्तियोगाद्वारे साधना करीत असत. ह्यासाठी ते श्रवण, मनन, निदिध्यास व साक्षात्कार अशा चार माध्यमांचा उपयोग करीत असत. साईबाबा भक्तीच्या नवविधा, म्हणजेच नऊ प्रकारामध्ये पारंगत होते. भक्तियोग म्हणजे स्वतःला भक्तिपूर्वक ईश्वराशी जोडणे. साईबाबांनी भक्तिमार्गाने स्वतःला भक्तिपूर्वक ईश्वराशी जोडणे. साईबाबांनी भक्तिमार्गाने स्वतःला भक्तिपूर्वक ईश्वराशी जोडणे. साईबाबांनी भक्तिमार्गाने स्वतःला ईश्वराशी जोडले होते. म्हणून ते भक्तियोगी होते. साईबाबांची भक्ती ही परा भक्ती होते. भक्त, भगवान व भक्ती हा बोध साईबाबांच्या बाबतीत अस्तित्वातच नव्हता. साईबाबा ज्ञानयोगीदेखील होते. त्यांनी साधनेने ज्ञावस्था प्राप्त करून घेतली होती. साईबाबा ज्ञाननिष्ठ होते. कारण त्यांच्या चित्तात आत्मज्ञान वा ब्रह्मज्ञान स्फूरले होते. गीतेत ज्ञानयोगात सांगितलेली अवस्था ही साईबाबांना लाभली होती. साईबाबा सांख्य होते. त्यांच्या अंतःकरणात मी आणि माझे ह्या विचारांची जागा तू आणि तुझे ह्या बोधाने घेतली होती. मी आणि माझे खरे स्वरुप तू आणि तुझे आहे बोध म्हणजेच आत्मबोध किंवा ब्रह्मबोध. साईबाबांची निष्ठा ज्ञानयोगात होती, म्हणजे ती कर्मयोगात नव्हती असे म्हणणे चूक ठरेल. खरं म्हणजे ज्ञानयोग्याची ज्ञाननिष्ठा आणि कर्मयोग्याची कर्मनिष्ठा यांचा सुरेख संगम साईबाबांमध्ये झाला होता.

साईबाबा केवळ ज्ञानाद्वारे नव्हे, तर कर्माद्वारेदेखील ब्रह्माशी युक्त झाले होते. साईबाबा ज्ञाननिष्ठ होते आणि त्याचबरोबर कर्मनिष्ठदेखील होते. कारण तू आणि तुझेच ह्या बोधाने ते कर्मयोगाचे आचरण करीत असत. ज्ञानयोग ही कर्मयोगापेक्षा वरची पातळी असली तरीदेखील साईबाबा मात्र ज्ञानयोगाबरोबर कर्मयोगाचे आचरणदेखील करीत असत. साईबाबांनी हे सिद्ध केले आहे की कर्मनिष्ठा आणि ज्ञाननिष्ठा ह्या ब्रह्मनिष्ठा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. साईबाबांनी आपल्या आचरणाने

सिद्ध असे होते की ज्ञाननिष्ठा आणि कर्मनिष्ठा ह्या एकाच कर्मनिष्ठेचे तर - तम हे दोन आविष्कार आहेत. साईबाबा कर्मयोगी असल्यामुळे त्यांचे प्रत्येक कर्म हे परम पुरुषाची आराधना करण्यासाठीच ते करीत असत. ह्यामुळेच त्यांची सर्व इंद्रिये शांत होऊन ते ज्ञाननिष्ठेचे अधिकारी झाले होते. कर्म म्हणजे स्वधर्माचरणाची मूळ क्रिया. कर्म सहजासहजी होणे, आपण कर्म करीत आहोत याची जाणीव न होता कर्म सुरु राहणे किंवा निर्विकार कर्म सहजासहजी होऊ लागणे याला अकर्म संबोधिले जाते. साईबाबांचे प्रत्येक कर्म अकर्म होते. साईबाबा सर्व इंद्रियांना लगाम घालून त्यांच्यावर नियंत्रण ठेवून आपली सर्व इंद्रिये कर्मयोगात राबवीत असत. साईबाबा ज्ञानयोगी असूनदेखील त्यांनी कर्म सोडले नव्हते. कारण त्यांना माहीत होते की त्यांनी नित्य तृप्त होऊन कर्म सोडले तर भक्त त्यांचे अंधानुकरण करतील. त्यांचे काही भक्त अतृप्त असूनदेखील कर्म सोडतील आणि असे केल्याने त्यांची आध्यात्मिक प्रगती होणार नाही. साईबाबा कर्मत्याग करून सतत समाधीसुखात गढून जाऊ शकले असते. परंतु तसे करणे हादेखील एक प्रकार स्वार्थ ठरला असता म्हणून साईबाबा कर्म करीत असत. कर्मयोगी साईबाबा सर्व प्रकारची कर्म करीत असत. कर्मामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-निच्च असा भेदभाव ते कधीही करीत नसत. चित्त शुद्ध करण्याची शक्ती सर्वच कर्मामध्ये सारखी असते हे तत्व आपल्या भक्तांना शिकविण्यासाठीदेखील साईबाबा सर्व प्रकारची कर्मं करीत असत.

साईबाबांनी जीवाची पूर्णावस्था गाठली होती. जीवाची पूर्णावस्था म्हणजे सत्स्वरुपाचा साक्षात अनुभव. ज्ञानी पुरुष असल्यामुळे ते जाणून होते की सर्व आत्माच आहे. बुद्धी स्थीर झाल्यामुळे साईबाबा आनंदमय झाले होते. आत्म्याच्या ठिकाणी रममाण असल्यामुळेच साईबाबांना स्वानंदाची प्राप्ती झाली होती. देहाच्या कोणत्याही अवस्थेत त्याचा आनंद कमी होत नव्हता. साईबाबा ज्या ब्रह्मानंदाचे सेवन करीत होते त्याच ब्रह्मानंदाचे सेवन करण्याचा अधिकार आपल्या भक्तांना आहे आणि तो अधिकार मिळविण्याची पात्रतादेखील प्रत्येक भक्तामध्ये आहे अशी साईबाबांची धारणा होती. म्हणूनच आपल्या भक्तांना योग्य मार्गदर्शन करुन त्यांनीदेखील इंद्रियांच्या पलीकडे जाऊन ब्रह्मानंदाची अनुभूती मिळावी म्हणून ते मार्गदर्शन करीत असत.

आत्मज्ञान किंवा आत्मदर्शन हा अध्यात्मातील सर्वश्रेष्ठ अनुभव आहे. स्वतःचे पूर्ण ज्ञान होणे म्हणजेच आत्मज्ञान. साईबाबांना आत्मज्ञान झाले होते, त्यांना आत्मदर्शन झाले होते. ह्या आत्मज्ञानामुळेच साईबाबा पूर्ण समाधानी होते व ते इतरांच्या जीवनात समाधान निर्माण करु शकत असत. साईबाबा आत्मज्ञानी किंवा ब्रह्मज्ञानी असल्यामुळे ते सतत आत्मरत असायचे, ते सतत आत्मसुखाचा अनुभव घेत असायचे. ह्या आत्मसुखामुळेच त्यांना विषयसुखाची किंमतच वाटत नसे. ते आत्मज्ञ होते. आत्मज्ञ हा स्वतःच आत्मशक्ती रुप झालेला असतो किंवा तो निराकार आत्मशक्तीचा साकार पुतळा तयार होतो. आत्मज्ञ किंवा ब्रम्हज्ञ स्वयंमेव ब्रह्मच झालेला असतो. साईबाबादेखील आत्मज्ञ किंवा ब्रह्मज्ञ असल्यामुळेच स्वतः ब्रह्मच झाले होते. ह्यामुळेच संपूर्ण विश्वाची निमिती करु शकणारी ब्रह्मशक्ती साईबाबांच्या ठिकाणी विद्यमान झालेली होती. ही शक्ती केव्हा, कुठे व कशी वापरावी याचे सम्यक ज्ञानदेखील साईबाबांना प्राप्त झाले होते. ह्या ज्ञानाचा उपयोग करुनच ते अनाकालनीय चमत्कार करीत असत. अध्यात्म क्षेत्रातील काही अधिकारी व्यक्तीच्या मते चमत्कार करणे हा आध्यात्मिक प्रगतीतील एक मोठा अडथळा होऊ शकतो. चमत्कारांच्या भुलभुलैयांमध्ये गुंतलेल्या सिध्द पुरुषांची आध्यात्मिक प्रगती खुंटण्याचा धोका असतो. परंतु साईबाबांच्या बाबतीत ही शक्यता मुळीच नव्हती. कारण साईबाबा केवळ सिद्ध पुरुष नव्हते तर सिद्ध पुरुषापेक्षा कितीतरी पटीने असलेले ब्रह्मज्ञ होते. सिद्ध पुरुष विविध सिद्धींचा उपयोग करुन चमत्कार करु लागतो तेव्हा तो चमत्कारांच्या मोहजाळात गुंतून राहण्याची शक्यता असते. परंतु साईबाबा ब्रह्मज्ञ असल्यामुळे त्यांच्याकडे जी ब्रह्मशक्ती होती तिचा आविष्कार म्हणून साईबाबांच्या बाबतीत आपोआप चमत्कार होत असत. ते मुद्दाम चमत्कार करीत नसत. साईबाबांकडे असलेल्या सिद्धी ह्या हठयोगाद्वारे मिळविलेल्या शक्ती नव्हत्या तर त्या आत्मसिद्धी होत्या आणि म्हणूनच त्या विपरीत परिणामहीन होत्या.

साईबाबांना त्यांचे भक्त अवतार समजतात. अवतार म्हणजे घनीभूत ब्रह्म, मानवरूप झालेले ब्रह्म. अवतार शब्दाचा अर्थ होतो खाली अवतरणे, उतरणे, म्हणजेच खाली येणे. ब्रह्माची अमूर्त अणि मूर्त अशी दोन रुपे आहेत. कधीतरी स्वतःला पाहण्यासाठी अमूर्त रुप जडापर्यंत खाली येत असते. आणि मूर्त रुपात प्रगट होते. मनुष्य देह व इतर सर्व सचेतन देह ही अमूर्त ब्रह्माची मर्त रूपे आहेत. परंतु फक्त मानवामध्येच मूळ अमूर्त स्वरुपात जाण्याची जाणीव असू शकते. अर्थात प्रत्येक व्यक्तीपुढे मात्र अमूर्त रुपात परत जाण्याचे ध्येय नसते. कारण बहुसंख्य व्यक्ती मनुष्य देहात पशू जीवन जगत असतात. अशा वेळी मानवाला त्याच्या मूळ रुपात जाण्यास प्रवृत्त करण्यासाठी अमूर्त ब्रह्म मानवदेह

धारण करून मूर्तरुपात प्रगटते आणि ह्यालाच अवतार म्हणतात. साईबाबा ब्रह्मावतार होते. कारण ते मानवाला त्याच्या मूळ स्वरुपाकडे वळविण्यासाठी ब्रह्माने मानवी देह धारण करून घेतलेले मूर्त रुप होते. साईबाबा अवतार असल्यामुळे ते भक्तांना इंद्रियगम्य बाह्य सुख त्यागून बुद्धीगम्य आध्यात्मिक सुख अनुभवण्याचा संदेश देत असत. साईबाबा भक्तांना नेहमी ईशावास्य बुद्धीने कर्म करावीत असा उपदेश देत असत. कारण त्यांना माहीत होते की ईशावास्य बुद्धीने कर्म केल्यावर आपले भक्त कर्म करूनदेखील अकर्म, अलिप्त व सदा मुक्त होऊ शकतील. साईबाबा निर्गुण परब्रह्माचा सगुण अवतार असल्यामुळे ते स्थितप्रज्ञ होते. ह्या स्थितप्रज्ञ अवस्थेमुळेच साईबाबा नित्यसंतुष्ट होते. सर्व द्वंद्वांपासून ते मुक्त होते. भगवद्‌गीतेतील जगदगुरू श्रीकृष्णाने सांगितलेली स्थितप्रज्ञाची लक्षणे स्पष्टपणे साईबाबांकडे होती. त्रिगुणांनी त्यांचे चित्त विचलीत होत असे. स्तुती, निंदा, मानापमान त्यांच्या दृष्टीने सारखीच होती. ते बुद्धीशुद्धी होते. त्यांच्या कर्मास विधिनिषेधरुपी नियम लागू नव्हते. सर्व कर्म करुन ते अलिप्त होते. साईबाबांच्या बाबतीत स्वार्थाचा परार्थात लय झालेला होता. साईबाबा केवळ वाचेने व मनानेच नव्हे तर प्रत्यक्ष कर्मानेदेखील ते सर्वांचे परमस्नेही व हितकर्ते होते. साईबाबा त्यांचे अवतार कार्य अधिकाधिक व्यापकपणे करण्यासाठी लोकसंग्रह करीत असत. वसुधैव कुटुंबकम अशी त्यांची दृष्टी झाली होती. साईबाबांना साम्यावस्था लाभली होती. त्यांच्याकडे सद्‌बुद्धी होती आणि त्यांनी सर्वभुतात्मैक्य पूर्णपणे जाणले होते, अनुभवले होते.

साईबाबा आपल्या भक्तांना नेहमी स्वतःच्या कुलदैवतांची भक्ती करावयास सांगत. आपले कुलदैवत सोडून इतर देवतांची भक्ती करणे साईबाबांना पसंत नव्हते. साईबाबांच्या ह्या भूमिकेमागेदेखील आध्यात्मिक अधिष्ठान होते. वेगवेगळी कुलदैवते ही निर्गूण परब्रह्माची प्रतीके आहेत. भक्तिमार्गातील फल हे प्रतिकावर अवलंबून नसते. म्हणजेच प्रतीक कोणते आहे ह्यावर अवलंबून नसते. प्रतीक काहीही असो, प्रतिकाचे ठाई आपला भाव असतो त्या भावाचेच फळ आपल्याला मिळत असते. म्हणूनच प्रतिकांमध्ये भेदभाव करणे पूर्णपणे चूक आहे हा आध्यात्मिक संदेश आपल्या भक्तांना देण्यासाठी साईबाबा त्यांना आपापल्या कुलदैवतांची भक्ती करावी असा साईबाबांचा आग्रह असे.

साईबाबा पूर्णसंन्यासी आणि पूर्ण योगी होते. साईबाबांपाशी संन्यास व योग यांची एकरुपता झाली होती. ते न करून करीत होते व करुन करीत नव्हते साईबाबांची सदैव समाधी लागलेली असायची किंवा ते सदैव ध्यानयोगात असायचे. ते सदैव निर्विकार, निर्विचार असायचे. मात्र त्यांच्या शांततेतून, त्यांच्या स्थिरतेतून भक्तांना प्रेरणा मिळत असे. साईबाबा सदोदित द्वारकामाईत त्यांच्या आसनावर बसून असत. परंतु त्याच वेळी ते भक्तांच्या उद्धाराचे कर्मदेखील अव्याहतपणे करीत असत.

पुरुषोत्तमाची निर्मिती ही प्रत्येक जीवाच्या उत्क्रांतीची परिसीमा आहे. पुरुषोत्तम निर्माण झाला की त्या जीवापुरती उत्क्रांतीची प्रक्रिया पूर्ण होते. साईबाबा आध्यात्मिक अर्थाने निश्चितच पुरुषोत्तम होते. कारण पुरुषोत्तमाची सर्व लक्षणे साईबाबांच्या ठिकाणी एकवटलेली होती. साईबाबा बुद्धिमान व नीतिमान होते. त्यांच्याकडे दिव्य दृष्टी व अतींद्रिय शक्ती होती. साईबाबांपाशी चित्सृष्टीचा पूर्ण विकास झालेला होता. साईबाबा पुरुषोत्तम असल्यामुळे ते चैतन्याचा आविष्कार होते. प्रज्ञा व प्रतिभा यांचा पूर्ण उत्कर्ष साईबाबांमध्ये झाला होता. ते मनाने व संस्कृतीने अतिशय सामर्थ्यवान होते. दर्शनोत्सुक प्रत्येक व्यक्तीवर साईबाबांच्या व्यक्तिमत्वाचा इतका प्रभाव पडत असे की ती व्यक्ती साईबाबांचे वर्चस्व आनंदाने मान्य करीत असे.

साईबाबांचे निसर्गावरदेखील वर्चस्व होते. पुरुषोत्तम असल्यामुळे साईबाबा भक्तांच्या उद्धाराचे अद्‌भूत कार्य सहज करू शकत. पुरुषोत्तम असल्यामुळे साईबाबांच्या ठिकाणी षडरिपूंचा लवलेशदेखील नव्हता. त्यांचे जीवन म्हणजे दया, क्षमा, शांती इत्यादी सर्व सद्‌गुणांची, कधीही न आटणारी सरिता होती. पुरुषोत्तम साईबाबा जागेपणी व निद्रिस्थ असतांनादेखील, म्हणजेच देहाच्या सर्व अवस्थांमध्ये आत्म्यामध्येच रमलेले होते.


साईभक्तांनो, साईबाबांच्या आध्यात्मिक दर्शनाला पूर्णत्वाची सीमा घालता येणे अशक्य आहे. परंतु त्यांचे आध्यात्मिक दर्शन घेण्याचा लाभ मला देणाऱ्या माझ्या साईचरित्राच्या अभ्यासाला, विचारशक्तीला, आकलनशक्तीला निश्चितच सीमा आहेत. काळाच्या ओघात केवळ साईबाबांच्या कृपेने त्यांचे अधिकाधिक आध्यात्मिक दर्शन घेण्याचा लाभ श्रद्धा आणि सबुरीमुळे मला व्हावा अशी साईबाबांच्या चरणी प्रार्थना करून मी हा लेख पूर्ण करतो.

०००

सा
ई

अनुभव

# साई अनुभव



माझी पूर्वी म्हणजे ऑक्टोबर-नोव्हेंबरचा 'श्रीसाईलीला' अंक आमच्याकडे येईपर्यंत साईबाबांवर इतर देवांवर सर्वसाधारणपणे असते तेवढीच श्रद्धा होती. यापूर्वी श्रीगणेश हेच माझं आराध्य दैवत होतं. कारण साईच्या चमत्काराची प्रचिती मला आली नव्हती. परंतु या अंकात नवीनच सुरु झालेलं 'भक्तांचे अनुभव' हे सदर वाचलं आणि आजपर्यंतचं 'एक ईश्वरी अंश असलेला देवमाणूस' हे माझं साईनाथांविषयीचं मत बदलून माझं संपूर्ण जीवनच साईमय झालंय. भक्तांचे अनुभव या सदरातील एका साईभक्ताची माझ्यासारखीच अवस्था होती. पण त्याने त्याच्या जीवनातील एका कठीण प्रसंगात साईनाथांचा मनोभावे जप केला आणि तो त्या प्रसंगातून तरुन गेला. मला पोटदुखीचा विकार आहे. आणि मी हा अंक वाचत असतानाही माझ्या पोटात दुखत होतं. शिवाय माझी ही पोटदुखी एकटी येत नाही तर बरोबर उलट्या होणे, हातपाय थरथरणे, छातीत धडधडणे या आपल्या भावंडांनाही सोबत घेऊन येते. मला तर दुसऱ्या दिवशी चिपळूणला जायचं होतं. त्यामुळे मला खूपच भीती वाटत होती, कारण पोटात दुखणं सुरु झालं की चिपळून सोडाच पण दोन पावलंही मी चालू शकले नसते.

तेव्हा माझ्या मनात विचार आला की त्या साईभक्ताला जसा चांगला अनुभव आला तसाच मलाही आला आणि माझी पोटदुखी थांबली तर मी जन्मभर साईंच्या चरणी विनम्र राहीन आणि माझा हा अनुभव माझ्यासारख्याच इतर साईभक्तांना कळण्यासाठी साईलीला अंकाकडे पाठवीन. त्या दिवशी मी मुद्दामच पोटदुखी थांबण्याच्या गोळ्या घेतल्या नाहीत आणि केवळ 'ॐ श्री साईनाथाय नमः' हा जप मनोभावे करत राहिले. जवळ जवळ रात्री एक वाजेपर्यंत मी तो जप करत राहिले. आणि अतिशय आश्चर्याची गोष्ट घडली, की ज्याची मी स्वप्नातही कल्पना करू शकले नसते. मला त्यावेळी सारखा भास होत होता की माझ्या साईबाबांचा प्रेमळ हात माझ्या मस्तकावरुन फिरत आहे, ते मला धीर देत आहेत. त्या रात्री मला पहाटेपर्यंत अतिशय छान झोप लागली आणि इतकंच नव्हे तर दुसऱ्या दिवशी चिपळूणलाही कोणताही त्रास न होता व्यवस्थित पोहोचले. असाच अनुभव जर पूर्वी मला कोणी कथन केला असता तर मी त्याला वेड्यात काढलं असतं. कारण मी सायन्सची विद्यार्थिनी असल्याने माझा चमत्कार वगैरे गोष्टींवर विश्वास नव्हता. पण आता मात्र मला असं वाटायला लागलंय की साईबाबांचं नाव न घेता जगणं म्हणजे जगणंच नव्हे. केवळ संकटातच नव्हे तर ज्यावेळी मला वेळ मिळतो त्यावेळीही मी साईनामाचा जप करत असते.

आता माझी एकच इच्छा आहे की सर्वांना माझ्यासारखे चांगले अनुभव येवोत आणि अख्खं विश्वच साईमय होवो. आणि माझी खात्री आहे की प्रत्येकाने माणसातील चांगुलपणावर विश्वास ठेवून साईंच्या 'श्रद्धा व सबुरी' या मार्गाचा अवलंब केला तर प्रत्येकाचे जीवन सुखी होईल.

– एक साईभक्त

卐卐卐



# साईवंदना

## साई गुरु माझा

(अभंग)

साई गुरु माझा
प्राणाचा विसांवा
नामाचा महिमा
भजनात गावा ॥धृ॥

शिरडीला जावे
साई देऊळात
अगणित भक्त
नाचती भक्तीत
महापूजा त्यांची
आनंदाचा ठेवा ॥१॥

आनंदाचा ठेवा
आम्ही लुटणार
संसाराची चिंता
त्यात हरणार
जन्मोजन्मी खेळ
साई रंगवावा ॥२॥

भाग्यवान आम्ही
लाभलास गुरु
अगणित लीला
नित्य त्यांना स्मरू
पाहु साई रुप
त्यातला गोडवा ॥३॥

■ योगेश्वर अभ्यंकर

## शिर्डी ही अति पावन नगरी !

(चाल - अयोध्या मनुनिर्मित नगरी)

गोदा तीरावरी-
शिर्डी ही अति पावन नगरी ॥धृ॥

नभो मंदिरी लपता तारा
पिंगा घाली पहाट-वारा
सडा सिंचती नित दंव धारा
जिथे कोकिळा आम्रतरूवर गाती आसावरी ॥१॥

जेथिल निर्झर, पादप, राने
भावे गाती मंगल गाणे
साइ-भक्तिचे फुले चांदणे
मूक पशूही प्रेमाश्रूंच्या वर्षत श्रावण सरी ॥२॥

जिथे ग्रीष्म ना अती तापतो
जिथे न शिशिरहि कुणास छळतो
वसंत परि जन-मनी हासतो
पर्जन्याची तृप्त पैंजणे नाचे तालावरी ॥३॥

जिथे साइचे समाधि-मंदिर
विलसे मूर्ती अती मनोहर
भावे बघता सतत मुखावर
गौर कर्पुरा कांति लाजते विकसित
कमलापरी ॥४॥

जिथे राव वा रंक-मनाला
क्लेशाच्या ना स्पर्शे ज्वाला
परि साईची अगाध लीला
वृत्ति अनाहत नादाच्या नित नाचे तालावरी
शिर्डी ही अति पावन नगरी ॥५॥

■ डॉ. विनायक गो. दुर्गे, 'दुर्गेश'

## ।। साई धुनी ।।

साईंची धुनी मजला फार प्यारी
त्याची किमया फारच न्यारी
ज्यांसी आला अनुभव ते करती
गुण-गान साई धुनी-उदीचे
मी पामर त्याचे गुण-गान किती करु ।।१।।

साईंची धुनी फार आगळी
ती सतत सूर्यासारखी तेजस व
चंद्रासारखी शितल राही
धुनीची उदी कोणी लावी मस्तकी
तर कोणी लावी मुखी आणि होई पिडामुक्त ।।२।।

साईंची उदी फार उपयोगी
दिन-पीडितांची वैद्यरुपी काठी
सुखःदुःखाची उदी साथी ।।३।।

उदीशी नाही ठाव भेदभाव
ती साऱ्यांना देई धुनीकडे वाव
साईंच्या उदीत भारी प्रभाव
जीव क्षणात होई पीडाहारी ।।४।।

अशी ही साईंची धुनी उदी मजला प्यारी
तिची किमया फारच न्यारी

■ अनिल महादेव कापकर
माहिम.

## साई माऊली तू

साई माऊली तूं, माऊली जगाची
शिरडीत साठली रे माया त्रैलोक्याची ।।धृ।।
कुठे ठेवला रे साई-मुकुट सोनियाचा
चक्र गदा आहे कोठे-भार आयुधांचा
आम्ही नाही विसरलो कथा द्वापाराची... ।।१।।

साई माऊली तूं माऊली जगाची

रुप पालटोनी-जाहला फकीर
परी झाकला ना जाई, गोकुळीचा चोर
मशिदीस देसी म्हणूनी-उपमा द्वारकेची ।।२।।

साई माऊली तूं माऊली जगाची

कधी वैभवात न्हाशी-कधी दरवेषी ?
युगा युगी काऊसे खेळ करविशी ?
तुला बांधूनिया ठेवी, माया लेकरांची... ।।३।।

साई माऊली तूं, माऊली जगाची

अर्जुनास ज्ञान बोध, केला किती मोठा
श्रद्धा सबुरीचा दिला-आज मंत्र छोटा
नित्य पाजी तान्ह्यालागी-गुटी अमृताची ।।४।।

साई माऊली तू माऊली जगाची

■ ग. के. कुलकर्णी

## "श्री बाबा साई"

क्षणा-क्षणांनी आठवण येते तुझी श्री बाबासाई ।
तुला भेटण्यासाठी मी निघालो शिर्डी धामी ।।१।।

वर्षा-वर्षांनी शिर्डीत येतो श्री बाबा साई ।
तुझ्या दर्शनासाठी माझे मन व्याकूळ होई ।।२।।

हात जोडतो, चरणी मस्तक ठेवितो, शरण येतो श्री बाबा साई ।
दर्शन द्या मजलां ही विनंती तुझ्या पायी ।।३।।

तन, मन, धन, अर्पण करतो तुला श्री बाबा साई ।
आशीर्वाद द्या मजला ही विनंती तुझ्या पायी ।।४।।

निरोप घेता तुमचा श्री बाबा साई ।
अश्रु येती भरूनी नयनी, कंठ दाटून येई ।।५।।

गाऊ किती गाथा तुमची श्री बाबा साई नाथा ।
तुझ्या चरणी अविनाश हा ठेवितो माथा ।।६।।

■ श्री. अविनाश पाध्ये
बोरिवली.

## दखल

धनिकांची दिवाळी डोळे भरून
आपण कधीच पाहू नये
झुरते मन केवीलवाणे
आज त्यांना दावूच नये
थेंब थेंब झरत्या पापणीखाली
आपल्या घरची पणती घ्यावी
आसवांचे तेल भरून झाले की
वात वेदनेची चेतवावी...
शिर्डीत एकदा तेलाविना
साईंची दिवाळी झाली होती
आज तैसे बघणाऱ्यांनो
आमची तेवढी दखल घ्यावी

■ दीपक उदावंत
नागपूर.

बोधकथा

# आम्ही फक्त देण्यासाठी जगतो तुम्ही घेण्यासाठी जगता

- ह. ल. रानडे

एका आठ दहा वर्षाच्या मुलाची ही गोष्ट. तो एकदा असाच भ्रमंती म्हणून करण्यासाठी म्हणून गेला. फिरता फिरता त्याला तेथे एक बोराचे झाड दिसले. झाडाजवळ येताच त्याने त्या झाडाखाली पडलेली पिवळी बोरे पाहिली. ती पाहून तो खूपच हरकून गेला व त्याने ती बोरे खाण्यास सुरवात केली. ती खूपच गोड व चवदार असल्यामुळे त्याला ती फार आवडली. त्यामुळे झाडाखाली पडलेली बोरे खाऊन त्याचे समाधान होईना. म्हणून आणखी बोरे मिळावीत म्हणून त्याने ते झाड गदगदा हलवले. त्यामुळे आणखी बरीच बोरे खाली पडली. ती खाऊन पोट भरल्यावर त्याने झाडाकडे पाहून आनंदाने नमस्कार केला व तृप्तीची ढेकर दिली. कोणाचे काही फुकट घेऊ नये वा खाऊ नये अशा प्रकारचे संस्कार त्या बालमनावर झाले असल्यामुळे त्याला वाटले की आपण या झाडाची पोटभर बोरे खाल्ली, तेव्हा त्या बदल्यात आपण त्याला काहीतरी द्यावयास पाहिजे म्हणून तो झाडाला म्हणाला ''वारे दादा, तू किती रे चांगला नी उदार आहेस ! मी तुझ्याखाली पडलेली बोरे खाल्ली. ती पुरली नाहीत म्हणून तुला गदगदा हलवून, त्रास देऊन आणखी बोरेपण पाडली. पण तू मला एका शब्दानेपण बोलला नाहीस किंवा तुला जोराने हलविले तेव्हा रागावलापण नाहीस. उलट तू मला आणखी बोरे दिलीस ! मी अधाशासारखी बोरे खातांना तू हटकलेपण नाहीस. एवढेच नव्हे तर आता पुरे कर असेसुद्धा तू मला म्हणाला नाहीस. शिवाय बोरे खाऊन झाल्यावर तू त्यासाठी मजजवळ काही मागितलेही नाहीस. तेव्हा काहीही न मागता देण्याचे हे शास्त्र तू कोठून व कसे काय शिकलास हे मला सांग ना.



अन् हे बघ, तू जरी घेत नसलास तरी मी मात्र तुला बोरे खाल्यावर काहीतरी देणार आहे, हे नक्की. मग सांग ना मी तुला काय देऊ ? लवकर सांग.''

बराच वेळ बोरदादाने काहीच उत्तर दिले नाही. पण मुलाने पुन्हा पुन्हा विचारून त्याला अगदी भंडावून सोडले. तेव्हा बोरदादा नुसताच मोठमोठ्याने खो खो हसतच सुटला. त्याचे हसणे तेव्हा मुलगा म्हणाला, ''अरे ! मी लहान आहे म्हणून हसून तू माझी नुसती थट्टाच करतोस काय ? तू काहीतरी उत्तर दे ना ! अनं लक्षात ठेव तू जर काही उत्तर दिले नाहीस ना तर मी येथून मुळीच हलणार नाही. आता मात्र बोरदादाचा अगदी नाईलाज झाला व त्याला उत्तर द्यावेच लागले. बोरदादा म्हणाला ''अरे ! मी तुझ्यासारख्या लहान मुलाजवळ कसे काय मागणार ? अन् मागितले तरी तू मला देणार तरी काय ? अन् काय रे ! बोरे खाल्ल्यावर मला काहीतरी देण्याची ही अक्कल तुला कोणी शिकविली ? मला तर तू अगदी जगावेगळा दिसतोस ! अरे ! मी या अरण्यात गेली बारा-पंधरा वर्षे वास्तव्य करीत आहे. अनेक लोक या अरण्यात येतात. माझ्या खाली पडलेली बोरे खातात. तेवढी न पुरल्यामुळे मला खूप जोरजोराने हलवून माझ्या अंगावरची उरली-सुरली बोरेपण पाडतात व तीपण फस्त करतात. अरे ! येथपर्यंत ठीक आहे. पण माझे हाल एवढ्यावर थांबत नाहीत. माझ्या शेंड्यावर काही बोरे राहिलेली दिसल्यास तीसुद्धा मोठमोठे धोंडे मारून पाडण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे मला खूप यातना होतात व जखमासुद्धा होतात. शिवाय बोरे पडली नाहीत तर ही माणसे मला शिव्या घालायलासुद्धा कमी करत नाहीत. काहींचे तर लत्ताप्रहारही मला

सहन करावे लागतात. केवढा हा क्रूरपणा व कृतघ्नपणा ! खाल्ल्या घराचे वासेच मोजणारी तुम्ही मंडळी! फुकटचं खायला मिळतं म्हणून किती खायचं व किती न्यायचं याला काही मर्यादा ! तुम्ही पोटभर खा ना ! आणखी पिशव्या भरभरून कशाला नेता ? व त्यासुद्धा आम्हाला छळून व कृतज्ञतेचा एकही शब्द न उच्चारता ! वास्तविक, तुला सांगतो या नराधमांना माझी फळे खाण्याचा तसा मुळीच हक्क नाही. त्यांनी थोडेच मला या अरण्यात लावलंय ! मला कधी पाणी तरी घातलय का? अरे ! मला लावलं ते माझ्या पक्षीमित्रांनी. माझी बोरे खाऊन त्यांनी त्या बिया निरनिराळ्या ठिकाणी या अरण्यात टाकल्या व त्यामुळेच आम्ही उगवलो. हे पक्षीराजच आमचे जन्मदाते आहेत. त्यांनाच फक्त आमची फळे खाण्याचा अधिकार आहे. अरे ! हे पक्षीसुद्धा आमची फळे खाताना शहाण्यासारखे वागतात. आमच्या लहान व कच्च्या फळांना ते कधीच हात लावत नाहीत. आमची फळे पिकली की मगच ते त्यांना हात लावतात. याउलट ज्यांच्या वाऱ्यालापण उभं राहू नये अशी तुम्ही माणसं ! अरे ! या अरण्यातील हिंस्त्र जनावरापेक्षा मला तुम्हा माणसांचंच फार भय वाटतं. तुम्ही आमचा केव्हा व कसा निकाल लावाल हे काहीच सांगता येत नाही. वास्तविक आम्ही तुम्हाला प्राणवायु देऊन जगवतो व तेसुद्धा तुम्ही बाहेर सोडत असलेला घाणेरडा वायु शोषून. मग ज्या झाडांच्या जीवावर तुम्ही जगता त्यांच्यावर असा हल्ला करून त्यांना छळता ? उपकार करणाऱ्यावर अपकार करण्याची ही तुम्हा मानवाची कोठली रीत ? आम्ही सतत देत रहायचं व तुम्ही न दमता सतत घेत रहायचं हे तुमचं कोणतं तत्त्वज्ञान ! अन् मग तुम्ही जीवनामध्ये कसे काय यशस्वी व सुखी होणार ! अरे बाबा ! तुम्ही माणसं सारखंच घेण्याचं बंद करून जेव्हा त्यातलं काही द्यायला शिकाल ना तेव्हा तुम्हाला कधीच काही कमी पडायचं नाही.

बोरदादाने त्याची ही अंतःकरण पिळवटून टाकणारी मानवाची कसाबकरणी सांगितली तेव्हा त्या मुलाचे अंतःकरण विदीर्ण झाले. त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले व बोरदादाला काय उत्तर द्यावे हे त्याला काहीच सुचेना. असा बराच वेळ गेला व शेवटी न राहवून त्याने बोरदादाला विचारले, "अरे, ही माणसे तुला एवढा त्रास देतात, मग तू त्यांना बोरे देण्याचेच का बंद करत नाहीस ? झाडावर बोरे आली रे आली की ती आपणच गट्टम् करून टाकायची. मग तुझा सर्वच त्रास वाचेल की !"

त्यावर बोरदादा म्हणाला, "तू म्हणतोस ते खरे आहे. माझ्या मनातपण अगदी असच येतं. पण असा विचार मनात आला की तो सृष्टिकर्ता आम्हाला बजावतो व सांगतो, "असला नतद्रष्ट विचार तुम्ही मनात मुळीच येऊ द्यायचा नाही. आपल्याशी लोक नीट वागत नाहीत, आपल्याला त्रास देतात म्हणून आपण त्यांच्यासारखच वागायचं ? मग त्यांच्यात व आपल्यात फरक तो काय ? सोन्यानं सोन्यासारखंच वागलं पाहिजे. शिवाय हे लक्षात ठेवा की मी तुम्हाला जे निर्माण केलंय ते तुमच्यासाठी नाही तर दुसऱ्यांसाठी. म्हणून तुम्ही जगायचं ते देण्यासाठी. घेण्यासाठी नाही. तुम्हाला जी पाने, फुले, फळे येतील त्याचा उपभोग तुम्ही मुळीच घ्यायचा नाही. तुम्ही ती सर्वच्या सर्व अगदी उदार अंतःकरणाने व आनंदाने येईल त्याला वाटून टाकायची. त्याच्या बदल्यात तुम्हाला मिळणारपण काही नाही. शिवाय कोणी काही देऊ लागलं तर ते तुम्ही घ्यायचंसुद्धा नाही. कारण तुमच्या खाण्या-पिण्याची व्यवस्था मी करून ठेवलेली आहे ना ! मग कशासाठी म्हणून दुसऱ्यापुढे हात पसरायचा ?"

मग तूच मला आता सांग की त्या सृष्टिकर्त्याची अशी आज्ञा असल्यावर तू म्हणतोस त्याप्रमाणे मी माझी फळे कशी काय खाऊ शकतो ? अन् समजा त्याच्या आज्ञेविरुद्ध वागलो की तो आमचं अन्नपाणीच बंद करील की ! मग आम्ही जगायचं कुणाच्या जीवावर ! शिवाय पुन्हा खरं सांगू का की त्या सृष्टिकर्त्याची सर्वच्या सर्व गोष्टी देऊन टाकण्याची कल्पना मला फार आवडते. कारण सर्व गोष्टी देऊन टाकल्यापुढे त्या सांभाळण्याचा आमचा त्रास नाही का वाचत ? सर्वस्वाचं दान केल्यामुळे आम्ही अगदी निश्चिंत व निवांत असतो व शांतपणे झोपी जातो. याउलट तुम्ही माणसं जन्मभर खूप साठवत बसता, अन् ते सांभाळण्यासाठी म्हणून तुमची रात्रीची झोप घालवून बसता.

मुलगा म्हणाला, "अरे, पण मी आपणहून तुला देतोय तर ते तुला घ्यायला काय हरकत आहे ? तू थोडच मागितले आहेस ? अन् हे बघ मी जे तुला देईन ते तू तुझ्याजवळच ठेव ना! तुझ्या त्या भगवंताला सांगू नकोस म्हणजे झालं." त्यावर बोरदादा ताडकन् उत्तरला, "अरे ! तुझ्याकडून मी जे काय घेईन ते मला गुप्त कसं ठेवता येईल ? तो सृष्टिकर्ता तर आमच्यावर सक्त पहारा ठेवून असतो. शिवाय तू जे मला देणार ते ठेवायला माझ्याजवळ जागा तरी कुठाय ? या अरण्यात मी ज्या जागेवर उभा आहे तेवढीच जागा मला वापरता येईल शिवाय आम्हा वृक्षमंडळींना आपला व्यवहार अगदी उघडा ठेवण्याबद्दल सृष्टिकर्त्याचा हुकूम असल्यामुळे मला तू जे देशील ते दडवून तो हुकूमपण मोडता येणार नाही, तुम्हा माणसांसारखा. तेव्हा माझं आपलं ऐक अन् तू येथून अगदी आनंदाने आपल्या घरी जा. मी तुझ्याकडून काहीच का घेत नाही हे तुला चांगलं समजावून सांगितलंय. ते सर्व जर तू तुझ्या मानव मित्रांना सांगितलेस तर तू मला खूप दिल्यासारखे होईल. कारण मग आम्ही वृक्षमित्र आपापले काम निवांतपणे करू शकू ना ! मग जा तर लवकर व आपले काम लगेच सुरु कर जा, उशीर कशाला ?

०००

# संसाराची साल

– शाम जुवळे



❖❖❖

**संसार आणि परमार्थ ही जीवन सफलतेची दोन अंगे आहेत. परमार्थासाठी संसार सोडण्याची गरजच नाही. तर संसाराचे सार समजून घेऊन तो गोड केला तर असा संसार परमार्थाचे सुंदर साधन बनून जातो. अशा या संसाराबद्दल श्री. जुवळे यांचे विचार.**

❖❖❖

वृक्षावर फळे जन्म घेत असतात. जन्म झाल्यावर फळे वाढत असतात. वाढ होता होता कच्ची फळे पक्की होत असतात. पक्व झालेली फळें माणूस मोठ्या आनंदाने खात असतो आणि स्वतःच्या मनाची तृप्ती करून घेत असतो. हे सर्वकाही सहजपणे घडत असते. याकडे बुद्धीने विचार करण्यासारखे काहीच नसल्यासारखे माणूस वागत असतो. मनसोक्त खावे आणि झोपावे यापलीकडे काही जीवन आहे असे माणसास वाटत नाही. समाजात बहुसंख्य लोक अज्ञानाने जीवन जगत असतात. जीवन हे सरितेच्या जीवनाप्रमाणे (जलाप्रमाणे) गतिमान ठेवून सागराप्रत (ध्येयाप्रत) वहात ठेवावे लागते. यातच माणसाच्या बुद्धीचे चातुर्य-कौशल्य दिसून येत असते. सरिता जशी अंगी प्रेरित उत्साह बाळगून आणि ध्येयाने होवून सारखी सागराच्या दिशेने सागर गाठण्यासाठी मोठ्या निश्चयाने, तसेच थोर जिद्दीने वहातच रहात असते. तिच्या शुद्ध आणि पवित्र नजरेसमोर सागराविना दुसरे काहीच असत नाही. या ध्येयाचा ध्यास तिला लागलेला असतो. ध्येय गाठणे याच एका जबरदस्त शक्तिशाली विचाराने सरिता प्रेरित झालेली असते. मार्गात कोठेही ती विसावत नाही. समय (वेळ) गमावलेला तिला रुचत नाही. वेळ वाया दवडणे म्हणजे जीवन फुकट घालविणेच होय, हे ती पुरेपूर जाणून असते. मानवासाठी सरिता म्हणजे जीवनाचा थोर आदर्शच होय. रिते (खाली) होवून (गर्व टाकून) त्यातच रममाण (रत) झालेली सरिता मानवाला संसारात कसे चांगुलपणाने



वागावे याचे सतत धडे देत आलेली आहे. सरिता ही मानवाची आदर्श शिक्षिका होय. या शिक्षिकेने मानवास खरे जीवनाचे शिक्षण देवून संसारात साक्षरतेचा प्रचार आणि प्रसार तिने सर्वप्रथम केलेला आहे. सरितेचा संसार आणि संसारातील सरिता मानवास दुहेरी शिक्षण देवून प्रपंचाचा परमार्थ कसा करावा हे शिकवित आलेली आहे. सरितेचा विसर म्हणजे कृतघ्नता होय. सरितेविषयी मानवाने खरे म्हणजे कृतज्ञता व्यक्त करून गुरुच्या (शिक्षिकेच्या) स्थानी वसत असलेल्या सरितेला वंदनपूर्वक मान दिला पाहिजे. देवाची कृपा कृतज्ञतेतून प्राप्त होत असते.

या जगात डोळस राहून निसर्गाचे निरीक्षण विचाराने आणि बारकाईने केले असता निसर्गात सरितेसारखे अनेक सद्गुरू व्यक्तीला मार्गात भेटतच असतात. निर्भय, निर्भिड, निर्मळ, निरंहकारी राहून विनम्रभावाने जगात वसावे म्हणजे सुखच सुखाला कवटाळीत असते असा संत ज्ञानेश्वर महाराजांसारखा अमृतानुभव आपणासाठी येतच असतो.

संसार स्वार्थासाठी वापरला असता असंख्य अडचणी, संकटे, आधिव्याधी, चिंता वगैरे नेहमीच उद्भवत असतात. संसारातील भोग हाच एक महान रोग आहे. संसारात ''योग'' धारण करून राहिले असता तोच संसार अगदी सुखाचा होत असतो ''युज'' या धातुपासून ''योग'' हा शब्द बनला आहे. ''युज'' म्हणजे जोडणे. निसर्गाला जोडून रहावे म्हणजे ''योग'' आपोआपच साध्य होत असतो.

ॐ या आद्याक्षरातून सहजपणे इतर शब्द साकारतात तेव्हा ते नैसर्गिक म्हणून ओळखले जातात. शब्दाद्वारे आपण जगाशी वैचारिक संपर्क साधीत असतो. ज्याने हे जग निर्माण केले तो ईश्वर अव्यक्त राहून जगाचा सांभाळ करीत आहे. ईश्वराचा हा नैसर्गिकपणा होय.

शब्दातील तू अर्थ ईश्वरा
तूचि सद्भावना।
कर्ता तू अन् तूच करविता
नसे तुजशी तुलना ॥१॥

रिते न येथे काही ईश्वरा
काही नसे तुजविना।
तुझ्यासारीखा तूच ईश्वरा
म्हणून तुला वंदना ॥२॥

संसाराची वाट चालता
होती बहु यातना।
सोडविता तू एक ईश्वरा
न लगे तुज याचना ॥३॥



देहबुद्धि ते फाटे फुटता
नेती आडराना।
तुझ्यासवे हा जीव नांदता
सुख होतसे मना ॥४॥

वज्रकवच ते तुझे ईश्वरा
दूर सारी वासना।
सुखासवे मग सुख खेळला
फुलवितसे जीवना ॥५॥

संसाराला भवसागर असे संबोधिले आहे. या सागरात जसे मोती-माणके असतात त्याप्रमाणे मगरी-मासेसुद्धा वसत असतात. असा हा दुटप्पी संसार तरून जाणे हे महाभयंकर कार्य आहे. मार्गदर्शक सुदैवाने मिळाल्यास संसाराचा महासागर तरून जाणे सुलभ होत असते. संतपुरूष हे खरे येथील मार्गदर्शक होत. कारण समाज-सेवा करणे हेच त्यांचे ब्रीद असते. त्यांची ही सेवा निःस्वार्थ असल्यामुळे त्यांच्यापासून धोका संभवत नाही. या मार्गात देहबुद्धिपेक्षा निर्मळ-शुद्ध मनाला प्राधान्य दिले जाते. सुख-दुःख हेच चित्ताचे विकार मानले आहेत. तेव्हा विकारापासून मन अलिप्त ठेवून येथे विकास साधावा लागतो. हा विकास मुख्यत्वे मनाचा असल्यामुळे मन व्यापक बनले असता दया, क्षमा, शांती अशासारखे सद्‌गुण आपोआप अंतःकरणात जमा होत असतात. ''दया करणे जे पुत्रासी। तेचि दासा आणि दासी॥'' अशी संत तुकाराम महाराज यांच्यासारखी जगात शुद्ध भूमिका बजावता येत असते. या भूमिकेत कष्ट हे करावेच लागतात. पण ते सह्य होत असून जीवाला सुख देणारे ठरतात. त्यागात सुख-शांती वसत असते. भोगवृत्तीने हे साधत नाही. येथे शुद्ध आचरण हेच ईश्वर-पूजन मानले आहे.

पाऊस पडून गेल्यावर त्याची खूण म्हणून मागे ओलावा रहात असतो. ओलावा हा पावसाची साक्ष देत असतो. संतपुरुषाचा सत्संग केल्याची खूण म्हणून वृत्ती सुधारत असते. सुधारलेली वृत्ती सत्संगाची साक्ष देत असते. संसारात वागावे कसे याचे मार्गदर्शन सत्संग करीत असतो. येथे बुवाबाजी चालत नाही. लपवाछपवी काम करीत नाही. खोटेपणाचा बहाणा येथे दगा देत असतो. हृदयात चाललेली घालमेल व्यक्तीच्या चेहऱ्यावर त्याचे पडसाद उमटवीत असते. चेहरा हा हृदयाचा आरसा आहे. आरसा कधी खोटे काम करीत नाही. जे जसे आहे ते तसेच्या तसे आरसा दर्शवीत असतो.

जीवन निष्कलंक राखण्यास दैनंदिन जीवनात अतिशय दक्ष रहावे लागते. येथे या संसारात मोहाचे पायाला बोचणारे असंख्य काटे जागोजाग पसरलेले असतातच. काटे टाळून पाय टाकावे लागतात. संसारातील वाटचाल महाकठीणच असते. ही बिकट वाट चालताना संसारी माणसाला यातना होणे साहजिकच आहे. गोड बोलून साल काढणारे लोक या जगात पुष्कळच आहेत. आमिष दाखवून लुटणारे लोक बरेच आहेत. विश्वासात घेवून विश्वासघात करणाऱ्या दुष्ट लोकांचा येथे तुटवडा नाही. म्हणून कुठल्याही मोहाला संसारी माणसाने भुलून जावू नये. मोह म्हणजे अज्ञानच होय. पोटाची लहानशी खळगी भरण्यापुरते श्रम प्रत्येकाला करावे लागतात. परंतु भलतीच आशा-आकांक्षा धरून माणसाने श्रीमंत होण्याची दिवास्वप्ने रंजवू नयेत. दिखावू

मोठेपणा सूज्ञ संसारी माणसाने सदैव टाळावा हेच श्रेयस्कर होय. जगात कितीही मिळविले तरी माणसाची तृप्ती होतच नाही. लोभाने माणूस आडरस्त्याला जावुन फसला जातो हे विसरू नये.

फळाची वर असलेली साल काढून फेकून द्यावी लागते. तरच आतील फळाच्या रसाची गोडी माणूस चाखू शकतो. म्हणजेच सालीचा वियोग सहन करून माणूस फळाचा आस्वाद घेत असतो. तद्वतच ही संसाराची वरील साल काढून टाकून त्याच्या आत वसणारा आनंद माणसाला घ्यावा लागतो. वियोगातही सुख साठविलेले असते ते या प्रकारचे असते. माणसाच्या देहावरील कातडी राठ असते. या राठ कातडीला महत्त्व न देता आतील कोमल व सुंदर हृदयाची जोपासना माणसाने दक्ष राहून करावी म्हणजे हृदय स्वच्छ, शुद्ध व पवित्र होत असते. ऊस बाहेरून ओबडधोबड दिसत असतो. परंतु त्याचा आत असलेला रस गोड असतो. बाह्य जगाला भुलून न जाता आत वसत असलेला ईश्वर अंतर्मनाने पहावा. तोच ईश्वर जीवाला सुख देण्यास पात्र असतो. ईश्वर म्हणजे कोणी व्यक्ती नसून ईश्वर म्हणजे ''तत्व'' होय. सर्व बाजूने, सर्व दृष्टीने जे ''तत्व'' चांगुलपणाच्या शिंपल्यात बसत आहे ते प्रत्येकासाठी चांगलेच असते. ईश्वर सर्वांसाठी चांगलाच आहे.

'सत्यम-शिवम्-सुंदरम' असे ईश्वराचे वर्णन केलेले ग्रंथामध्ये आढळते. ''सत्य'' सर्वांसाठी सुयोग्य ठरते, शिवम म्हणजे कल्याण करणे, हेसुद्धा सर्वांना हवे असते आणि सुंदरम म्हणजे देखणे-सुबक दिसणारे याचीसुद्धा सर्वच वाखाणणी करीत असतात. म्हणजेच ईश्वर हा सर्वांनाच प्रिय असाच आहे. या दृष्टीने पहाता या जगात सर्वच ईश्वराला मानणारेच आहेत, नास्तिक असा कोणी नाहीच.

ईश्वराने अग्नीबरोबर दाह शमविण्यासाठी पाण्याची योजना केलेलीच आहे. मऊ (नरम) जिभेबरोबर टणक (कठीण) दांत निर्माण करून ठेवले आहेत. मानवाचे कोठेही अडून राहू नये म्हणून दयाशील परमेश्वराने या सर्व गोष्टी मानवासाठी उपलब्ध करून ठेवल्या आहेत. सूर्याबरोबर चंद्रही आकाशात विराजमान करून ठेवला आहे. या सर्व गोष्टी ईश्वराने मानवास विनामूल्य उपलब्ध करून दिलेल्या आहेत. याचाच सरळ अर्थ ईश्वर हा दयाळू-कृपाळू असाच आहे.

विनाशी देहाबरोबर शाश्वत आत्मा देहात वसत असतो हे मानवाने विसरून चालण्यासारखे नाहीच नाही. जीवनाबरोबर मृत्यू हा असतोच असतो मृत्यूचे मानवाला भय नसावे म्हणजे जीवन आनंद व शांतीने जगणे शक्य होत असते. मृत्यू (पतन) देहाचा असतो आणि जीव हा सनातन (पुरातन) असल्यामुळे अमर (शाश्वत) असतो. स्थूल देहाचे दहन करतात तर जीव आत्मसंगतीने अमर रहात असतो. देहाचा वियोग होत असतो; आत्मा म्हणजे ''योग'' होय. वियोग आहे म्हणूनच योगाची बहुमूल्य किंमत (महत्त्व) आहे. दुःख आहे म्हणून सुख हे चांगले वाटत आलेले आहे. सुखाने हुरळून जावू नये आणि दुःखाने होरपळूनही जावू नये. प्रत्येक गोष्टीत संयम राखून सुवर्णमध्य गाठावा हेच सर्वोत्तम होय. दीप दोन खोल्यांच्या मध्यभागी असलेल्या उंबरठ्यावर तेवत ठेवावा म्हणजे दोन्ही खोल्यात उजेड राहील. प्रपंच आणि परमार्थ योग्य प्रमाणात वसत असले म्हणजे संत ज्ञानेश्वर महाराज यांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येकाचा संसार सुखाचा होईल. खाण्याचे पान मोठे असते त्याप्रमाणे परमार्थ मोठा करावा आणि पानाला थोडा चुना लावतात त्याप्रमाणे प्रपंच लहान करावा हे येथील सुयोग्य प्रमाण होय.

नाम-रुपाच्या या जगात रुप विनाशी आहे तर नाम अविनाशी आहे. हे ओळखून नेहमी नामाची कास धरूनच संसारात वसावे हेच सुखी जीवनाचे एकमेव गमक होय. प्रत्येकाने आपणालाही मृत्यू येणारच आहे हे सतत ध्यानात ठेवावे. आपणाला मृत्यू नाही असा भ्रम मनात मुळीच नसावा. एवढेच ध्यानात ठेवावे की जोपर्यंत जीवनात आनंद आहे तोपर्यंत मरणात मौज आहे. मरण हे कोणाच्याही हातात नाही. तरीपण जीवन असेपर्यंत ते जीवन सत्कारणी लावावे हेच सर्वोत्तम तसेच श्रेयस्कर ठरत असते.

समर्थ रामदास स्वामी म्हणतात त्याप्रमाणे प्रपंच हा नेटका (सुंदर) करावा; फाटका कधीच करू नये. समर्थांना अहंकार असणे मान्य नाही. बुद्धीचाही गर्व नसावा. समर्थ म्हणतात, ''बुद्धीने सर्वही होते । बुद्धिदाता नारायणु ॥ आधि तो आपुला की जे। लक्ष्मी चरणी वसे ॥''. पैशासाठी माणसाने जीवाचा आटापिटा करू नये. जीवाने ईश्वराला आपलासा करून घेण्यासाठी रात्रंदिन झटावे. प्रेम आणि सत्य हे दोन विश्वाचे आधारस्तंभ आहेत. सत्याचे पालन करून प्रेमाने जगात वसावे हाच सर्वोच्च मानवता धर्म होय. कोणत्याही जीवाचा द्वेष-मत्सर मनात असूच नये. प्रेमाने प्रेम वाढते तर द्वेषाने द्वेष वाढतच असतो. ईश्वरावरील व्यक्तीचे प्रेम म्हणजे भक्ती होय. प्रेमाची गोडी दुसऱ्या कोणत्याही गोष्टीत नाही. प्रेम एकमेकाला जोडून ठेवीत असते. प्रेमाएवढी शक्ती इतर कशातही नाही. अंगी बळ असावे ते प्रेमाचे असावे. प्रेमाने सर्व जग जिंकता येत असते.

खरे म्हणजे प्रेमाची वृत्ती हीच ईश-वृत्ती होय. प्रेम म्हणजेच परमेश्वर होय! प्रेमाने ईश्वराचे नाम घेतले असता प्रेमाच्या लहरी (स्पंदने) सर्व देह व्यापून साऱ्या जगभर पसरत असतात. देहाचे जडत्व प्रेमात विरून जात असते. जडत्वाचा मृत्यू झाल्याने जीव विदेहावस्थेत सर्वत्र संचार करीत असतो. देहबुद्धी नष्ट पावत असते आणि सदबुद्धीचे परिवर्तन प्रतिभेत होत असते. प्रतिभा म्हणजे प्रेमाची स्पंदने होत. येथे जीव आणि शीव अनन्य होत असतात. संसाराची सांगता होत असते.

०००

# गंगासागर तीर्थयात्रेचे म हात्म्य



आचार्य कपिल मुनी

**भारतीयांची माता गंगा नदी पश्चिम बंगालमध्ये जेथे सागरास मिळते त्या संगम स्थळाला 'गंगासागर म्हणतात. मकरसंक्रांतीच्या महापर्वावर तेथे प्रचंड मोठी यात्रा भरते. देशविदेशातून लाखो भाविक गंगास्नानासाठी या यात्रेस येतात. या संगम स्थळावरील कपिल मुनीचे प्राचीन मंदिर सागरात गेले तरी किनाऱ्यावर नवे भव्य मंदिर बांधण्यात आले आहे. त्यामुळे गंगासागर यात्रा आता वर्षभरात केव्हाही करता येते.**

हिंदू तीर्थस्थानांमध्ये 'गंगासागर' हे एक अतिपवित्र तीर्थस्थळ आहे. ''सारे तिरथ, बार बार, गंगासागर एक बार !'' या उक्तीतच गंगासागरचे महत्त्व स्पष्ट होते. हे स्थान कलकत्त्याच्या दक्षिणेस आहे. कलकत्ता ते गंगासागर बेटापर्यंतचा प्रवास हा बस व जहाजाद्वारे करावा लागतो. बोट प्रवासासह या प्रवासाचे एकूण अंतर १२८ कि. मी. आहे. कलकत्तापासूनही जहाजाद्वारे गंगासागर बेटावर जाता येते. परंतु बोटीने प्रवास हा जास्त असून वेळही भरपूर लागतो. त्याकरिता वेळ व खर्च वाचवून यात्रेकरू कलकत्त्यापासून ते समुद्रकिनारी असलेल्या हार्बर पाईंट काकद्विप व नामखाना येथून गंगासागर बेटावर जातात. या समुद्र प्रवासातच गंगा नदीचे पाणी अथांग समुद्रासमोरसुद्धा गोड लागते. याचा प्रत्यक्ष अनुभव यात्रेकरु घेत असतात. यालाच देवाची करणी... ! नी... भर समुद्रात गोड पाणी असेही म्हणता येईल. वरील तीनही स्थळापर्यंतचा बसप्रवास व पाईंटपासून ते गंगासागर बेटापर्यंतचा प्रवास खर्च हा प्रतिसीट अंदाजे रु. ५६ येतो. समुद्र व गंगा नदी यांचा येथे संगम झाल्याने या क्षेत्राला 'गंगासागर' असे नाव पडले.

या क्षेत्राची कथा अशी की, हजारो वर्षांपूर्वी सत्ययुगामध्ये महापराक्रमी चक्रवर्ती राजा सागर यास और्व ऋषीने अश्वमेध यज्ञ करण्यास सांगितला. तेव्हा त्याने पृथ्वी भ्रमण करण्यासाठी घोडा सोडला. राजा सागरने जेव्हा अश्वमेध य करण्याचे ठरविले तेव्हाच देवराज इंद्र आपले राज्य जाईल या भीतीने अतिशय घाबरला व त्याने या घोड्यास पळवून नेले व कपिल मुनींच्या आश्रमात बांधले. तेव्हा सगर राजाने आपल्या ६० हजार पुत्रांना घोड्यास शोधण्यासाठी पाठवून दिले. हे साठ हजार पुत्र इतके पराक्रमी होते की आपल्या वडिलांना पाणी पिण्यासाठी रोज एक नवी विहीर खोदत असत. तसेच त्यांनी पृथ्वी खोदून समुद्र बनविला अशीही आख्यायिका प्रसिद्ध आहे. अशा शक्तिमान पुत्रांना अश्वमेध यज्ञाचा घोडा सापडविण्यासाठी पाठविल्यामुळे जेव्हा हे पुत्र कपील मुनींच्या आश्रमाजवळ जाऊन पोहोचले तेव्हा देवराज इंद्राने त्यांना बुद्धिभेद केला. त्यामुळे जेव्हा राजा सगरच्या पुत्रांना अश्वमेध यज्ञाचा घोडा कपिल मुनींच्या आश्रमात बांधलेला दिसला. तेव्हा त्यांनी कपिल मुनींसारख्या महापुरुषांना अपमान केला, यामुळे अचानक सर्व पुत्रांच्या

अंगातून आग निघून त्या आगीतूनच ते सर्व साठ हजार पुत्र भस्मसात झाले.

काही वर्षानंतर राजा सगरचा नातून अंशुमन आपल्या आजोबाच्या आज्ञेनुसार अश्वमेध यज्ञाना घोडा शोधण्यासाठी बाहेर पडला. तेव्हा खूप परिश्रमानंतर समुद्राच्या किनारी कपिल मुनींच्या आश्रमात पडलेल्या राखेजवळ त्यास अश्वमेध यज्ञाचा घोडा दिसला. तेव्हा अंशुमनने कपिलमुनींची प्रार्थना करून व त्यांना प्रसन्न करून घोड्यास यज्ञासाठी घेऊन जाण्याची अनुमती मागितली. त्याचबरोबर भस्म झालेल्या तुझ्या साठ हजार काकांच्या पितरांचा उद्धार हा गंगाजलानेच होऊ शकोत हेही कपिल मुनींनी सांगितले. त्यानंतर राजा सगरने राहिलेला आपला अश्वमेध यज्ञ पूर्ण केला आणि त्यानंतर आपले राज्य आपला नातू अंशुमनला सोपविले. त्यानंतर राजा अंशुमनने आणि त्यानंतर त्याचा पुत्र राजा दिलीपने गंगेला पृथ्वीवर आणण्यासाठी हजारो वर्ष कठोर तपश्चर्या केली. परंतु ते गंगेला पृथ्वीवर आणण्यात असमर्थ ठरेल. त्यानंतर राजा दिलीपचा पुत्र 'भगीरथ' राजाने कठोर तपश्चर्या केली. या तपश्चर्येमुळे प्रसन्न होऊन भगवीत गंगेने राजा भगीरथाला दर्शन दिले आणि वर मागण्यास सांगितले. तेव्हा राजा भगीरथने गंगेला आपल्याबरोबर मृत्युलोकात येण्याची विनंती केली.

तेव्हा गंगेने राजा भगीरथाला सांगितले की, 'जेव्हा मी स्वर्गातून पृथ्वीवर येईन तेव्हा माझा वेग धारण करणारा कोणीतरी असला पाहिजे. असे न झाल्यास मी पृथ्वी फोडून पाताळात चालील जाईन. याशिवाय मी या कारणानेसुद्धा पृथ्वीवर येणार नाही की लोकांनी त्यांचे पाप माझ्यात धुतल्यावर मी माझे पाप कुठे धुवू. या विषयावर तू स्वतः विचार कर. त्यावर भगीरथ म्हणाला, ''ज्या सत्पुरुषांनी कुठल्याही धन, संपत्ती व परिवाराची अपेक्षा न करता, म्हणजेच संसाराचा त्याग करून कठोर तपश्चर्येद्वारा सतकार्यात तल्लीन झालेले आहेत. अशा सतपुरुषांच्या अंगस्पर्शाने तुमचे पाप नष्ट होतील. कारण त्यांच्यामध्ये प्रत्यक्ष भगवान शंकरच निवास करत आहेत. आणि शंकर भगवानच आपला वेग धारण करतील. कारण या संपूर्ण विश्वात स्वतः भगवान शंकरच सर्वज्ञ आहेत.

गंगेला याप्रमाणे सांगून भगीरथने भगवान शंकराला प्रसन्न करण्यासाठी त्यांची पण हिमालयात जाऊन कठोर तपश्चर्या केली. त्यामुळे थोड्याच दिवसात महादेव शंकर राजा भगीरथावर प्रसन्न झाले. भगवान शंकर तर संपूर्ण विश्वाचे हितचिंतक आहेत. राजाची मागणी त्यांनी तथास्तु म्हणून मान्य केली. त्यानंतर भगवान शंकराने गंगेला आपल्या जटेमध्ये धारण करून पृथ्वीवर आणले. त्यामुळेच भगवान शंकराच्या चरण स्पर्शामुळे गंगेचे जल पवित्र झाले आहे. राजा भगीरथ आपल्या पितरांचा उद्धार करण्यासाठी वायुसमान वेगाने चालणाऱ्या रथावर स्वार होऊन पुढे जात होता आणि त्याच्या मागे-मागे वाटेत येणाऱ्या देशांना पवित्र करून गंगा येत होती. अशाप्रकारे राजा भगीरथ त्रिभुवन पावनी गंगेला तेथून पश्चिम बंगालच्या समुद्र किनाऱ्यावर जेथे पितरांच्या शरीराची राख पडली होती तेथे घेऊन गेले.

याप्रकारे गंगासागर संगमापर्यंत पोहचून तिने राजा सगरच्या भस्मात झालेल्या पुत्रांना आपल्या जलाने पवित्र करून त्यांच्या पितरांचा उद्धार केला. याप्रमाणे याठिकाणी गंगा समुद्राला जाऊन मिळाली. त्यामुळेच या पवित्र ठिकाणाला 'गंगासागर' हे नाव पडले. गंगेचे महात्म्य असे की, प्रत्यक्ष भगवंतांनी 'स्त्रोतसाम्मी जान्हवी' (जान्हवी हे गंगेचे दुसरे नाव आहे) म्हणजे 'गंगा ही माझीच विभूती' असे म्हटले आहे. म्हणूनच गंगाकाठची धामे व गंगेची कथा यांना अनन्य महत्त्व प्राप्त झाले आहे. आद्य शंकराचार्यांनी 'काशीप्रांत' विहारीणी विजयते गंगा मनोहारिणी' अशा शब्दात तिचा जयजयकार केला आहे. स्कंद पुराणात 'विना स्नानेत गंडगायाम न्हणा जन्म निरर्थकम्' असे अगस्तीचे वचन आहे. तिच्या नुसत्या स्तवनाने, स्मरणाने, स्नानाने पापवासना नष्ट होऊन माणसाचे मन, वाणी व शरीर पवित्र होते. मनुष्य अंतर्बाह्य पवित्र बनतो व जन्माचे सार्थक झाल्याचे मानतो.

गंगेचे जल इतके पवित्र आहे की ते कित्येक वर्ष कोठेही भरून ठेवल्यास रहाते. तसेच धार्मिक विधी पुराणात सांगितले आहे. की कोणत्याही व्यक्तीच्या मृत्युसमयी त्याच्या मुखात गंगेचे पवित्र जल टाकले तर त्यास मोक्षप्राप्ती होऊन ती व्यक्ती स्वर्गात जाते पौष महिन्यातील मकर संक्रांतीच्या वेळी येथील यात्रा भरते. संपूर्ण भारतातून लाखो तीर्थकरु पवित्र गंगेत स्नान करून पापातून मुक्ती व पुण्याचे वाटेकरु बनण्यासाठी येतात. विश्वाच्या कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविक यात्रेकरुंसाठी पश्चिम बंगाल शासन वाहतूक, आरोग्यविषयक व इतर सेवा मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देते.

असे समजले जाते की, येथे स्नान केल्याने अश्वमेध यज्ञाचे पुण्य लाभते व मनुष्यास स्वर्गप्राप्ती होते. पूर्वीचे येथील कपोल मुनींचे मंदिर समुद्रात बुडालेले आहे. कधी कधी समुद्राचे पाणी कमी झाल्यास मूळ मंदिराचे अस्तित्व आपणास जाणवते. त्यामुळे तेथून थोडे अलिकडे आता एक नवीन मंदिर बांधले आहे. येथील मुख्य मंदिरात कपिल मुनी व गंगेची प्रतिमा आहे. या कारणामुळे आता गंगासागरचे दर्शन बारा महिन्यात कधीही करता येते.

ooo

## ग्रंथ परिचय

### प्रा. कुंटे यांचे दोन नवे ग्रंथ

# नाम साधकांना पर्वणी

विद्यानंद







'श्री साईलीला'चे लेखक, गुरुदेव रानडे परंपरेतील नामदीक्षित, डॉ. नरेंद्र सदाशिव कुंटे यांची दोन वाचनीय पुस्तके, अनुक्रमे **'नामसाधनेचा भक्तिप्रवाह'** आणि **'श्री गुरुदेव रानडे प्रणित अध्यात्म चिंतन'** नुकतीच मराठी साहित्य शारदेच्या दरबारात दाखल झालेली आहेत.

डॉ. कुंटे हे पेशाने प्राध्यापक आहेत. सोलापूर हे त्यांचे कार्यक्षेत्र आहे. पण अध्यापन- लेखनाशिवाय ते नामसाधक म्हणून नामप्रचारक म्हणून सर्वत्र अधिक परिचित आहेत. वरील दोन्ही ग्रंथ त्यांच्या विद्यापीठीय अभ्यासापेक्षाही साधनेतून - नामचिंतनातून साकार झालेली शब्दशिल्पे आहेत. त्यातील शब्दांमागे त्यांच्या साधनेची भक्तियुक्त शक्ती उभी आहे.

**'नामसाधनेचा भक्तिप्रवाह'** या सुमारे दीडशे पानी पुस्तकावर श्रीविठ्ठलाचे सुंदर कृष्णधवल चित्र असून वेगवेगळ्या १० लेखांचा त्यात समावेश आहे. एका अर्थी त्याला **नामसाधनेची दशपदी** असेही म्हणता येईल. पंढरीची वारी, निवृत्तीनाथांचे भक्तिगूज, ज्ञानदेवांचा हरिपाठ, सोपानदेवाची उपदेशवाणी, मुक्ताई मुक्त हरिनामे, तीर्थावळीतील भक्तिसंवाद, चोखा डोंगा परी..., नाथांचा पांगूळ, तुका आकाशाएवढा, निकोबाची भक्तिगंगा अशा नावाच्या विविध लेखांमधून श्री. कुंटे यांनी महाराष्ट्र भूमंडळी प्रवाहित झालेल्या भक्तिप्रवाहाचे 'गागर में सागर' असे शब्ददर्शन घडविलेले आहे.

'श्रीगुरुदेव रानडे प्रणित अध्यात्मचिंतन' या पुस्तकाला त्यांच्या आत्मियतेचा थोडा अधिक स्पर्श आहे. श्री निंबरगी महाराज- श्री अबुराव महाराज - श्री भाऊसाहेब महाराज - श्री गुरुदेव रानडे अशा परंपरेची गुरुकृपांकित नामदिक्षा लाभलेल्या भाग्यवंतांपैकी श्री. कुंटे हे एक आहेत. त्यामुळे भक्तांने-शिष्याने गुरुकृपेला वाहिलेले शब्दपुष्प असे या ग्रंथांचे यथार्थ रुप आहे, असे मला वाटते. या पुस्तकात गुरुदेवांचा परमार्थ सोपान, गुरुदेवांचे ज्ञानेश्वरी चिंतन, ध्यानगीतेतील भक्तियोग, अहर्निश परमार्थाची नामसंगती, आत्मज्ञानाने परमार्थवृद्धी, अध्यात्माची सामाजिक फलश्रुती आदी आठ लेख आहेत. **नामस्मरणात्मक भक्तियोग** या विषयावर सर्व लेखातून प्रामुख्याने भर दिलेला आहे. श्री गुरुदेव रानडे यांनी आपल्या स्वानुभवाधिष्ठित ग्रंथसंपदेतून जे अध्यात्मचिंतन मांडले त्याचा एक संक्षिप्त व संकलित आढावा असे या ग्रंथाचे एकूण स्वरूप आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे ग्रंथ कोण्या नामवंत धंदेवाईक प्रकाशकाने प्रकाशित केले नसून नाममहात्म्याच्या साधकांनी खर्चांनी हे ईशकार्य केलेलेआहे. कथा-कादंबऱ्या-गोष्टींच्या पुस्तकांना खूप मागणी असते म्हणून मोठे प्रकाशक असे ग्रंथ प्राधान्याने प्रकाशित करतात, वैचारिक-चिंतनात्मक साहित्याला मात्र प्रकाशक भेटत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. या वस्तुस्थितीचे रडगाणे न गाता ज्या नामधारक साधकांनी ही ग्रंथपुष्पे स्वखर्चाने सिद्ध कली त्यांचे करावे तेव्हढे कौतुक थोडे आहे. या साधकांचा आदर्श इतर भक्तिमार्गी संपन्न साधकांनी अनुकरण करण्यासारखा आहे. असे झाले तर मराठी सारस्वताचा दरबार पुन्हा एकदा चिंतनात्मक साहित्याने संपन्न-समृद्ध होईल असे मला वाटते. या दोन्ही पुस्तकांचे मूल्य केवळ १५ रु. (प्रत्येकी) ठेवून सामान्य जिज्ञासू नामधारक भक्तांचीही मोठी सोय केलेली आहे. श्री. कुंटे यांना पुढील ग्रंथलेखनास 'श्रीसाईलीला'च्या सहर्ष शुभेच्छा

**नामसाधनेचा भक्तिप्रवाह** (पाने १५०, किंमत रु १५)
**श्री गुरुदेव रानडे प्रणित अध्यात्मचिंतन**
(पाने १२६, किंमत रु. १५.)

लेखक : **प्रा. डॉ. नरेंद्र कुंटे**
'प्रज्ञा', ए-७४, आसरा गृहनिर्माण संस्था,
होटगी रोड, सोलापूर - ४१३ ००३.

ooo

# नामाच्या संगती, जीव ब्रह्मानंदी डोले

- भालचंद्र गन्द्रे



❖❖❖

**नाम महात्म्याची एक फार मोठी शक्ती आहे. एक जागी बसून राम राम जप करणारा वाल्या नाम महात्म्यामुळेच वालिमक ऋषी झाला. नाम रंगी रंगून जीव ब्रह्मानंदी डोलत डोलत अखेर ब्रम्हानंदीच तद्रूप होतो. अशा या आनंदमार्गी साधना बद्दल श्री. गन्द्रे यांचे काही विचार.**

❖❖❖

मनुष्यजन्म प्राप्त होणे, त्यांत संतांची भेट होणे नि संतांना नेमके ओळखून त्यांचा प्रत्यक्ष सहवास लाभणे, ह्या गोष्टी सहजसाध्य नाहीत. अनंत जन्मांची शिदोरी नि त्यांत घडलेले भगवद्-नाम यामुळेच संतांचा प्रत्यक्ष सहवास भाग्यवंतांना मिळतो. आपला शिष्य, आपल्यापेक्षा हुषार-मोठा व्हावा यासाठी हरेक टप्प्या-टप्प्यावर संतच गुप्तपणे आपल्या शिष्याची सत्त्वपरीक्षा घेत असतात. त्यानुसार सततचे दुःख नि वेदना, अश्रू यामुळे जीव बेजार होतो. काय करावे, कुणा पुसावे अशी 'भाहि भगवान' स्थिती होते. नको तो देव असेही जीवाला वाटून जाते. परंतु अशाही स्थितीत जो शिष्य अत्यंत चिवटपणे, चिकाटीने, सातत्याने देवाचे नांव घेत रहातो, तोच सरतेशेवटी मोक्ष मंदिराच्या पायऱ्या चढतो.

संतसंगती तीन प्रकारची असते. एकामध्ये प्रत्यक्ष देहधारी संताचा सहवास घडतो. दुसऱ्यामध्ये संताने सांगितलेल्या मंत्राचा सहवास घडतो आणि तिसऱ्या प्रकारांत संतांच्या विचारांची संगत घडते. प्रत्यक्ष कृतीपेक्षांही, संगतीचा परिणाम नकळत होतो,

म्हणून सत्संगत धरावी, हेच उत्तम !

देवाकडे प्रार्थना करतांना, ''तुला जसे ठेवायचे असेल तसे ठेव, पण तुझा विसर पडू देऊ नको'' असे अनन्यभावाने, करुणाभक्तीने मागावे, द्वैताचा जनक जो अभिमान तो कमी करण्यासाठी, मी कर्ता नसून, देव कर्ता आहे असे मानून, सर्वांभूती भगवद्भाव पहावा. सत्समागमासाठी सत्पुरुषांच्या वचनांवर विश्वास ठेवून त्याप्रमाणे वृत्ती बनवून संत सांगतील त्याप्रमाणेच वागावे. जर आपण संतांनी दिलेल्या नामावर श्रद्धा ठेवून नामस्मरणाचे सातत्य साधले तरच ह्या भवसागरांतून उत्तमपणे तरुन जाता येईल. अन्यथा, केवळ विद्वत्तेनुसार विचार करीत बसल्यास, फक्त चिकित्सा साधेल. उलटपक्षी, एखादा अडाणी माणूस संतांच्या शब्दावर विश्वास ठेवून, त्यांनी सांगितलेले देवाचे नाम घेवून उच्चपदी चढेल. यासाठी अध्यात्मात नि संतसंगतीत श्रद्धेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. नामाच्या योगानेच संतांची भेट होते. संत ओळखता येतात, जोडता येतात, टिकवताही येतात. यासाठी जो भगवंतांचे नाम घेईल त्याचे कांही अडणार नाही. उलटपक्षी, जस-जशी त्याची नाम-भक्ती वाढेल, उंचावेल तेंव्हा संतच त्याचा माग-वेध घेत त्याच्याकडे आपणहून येतील. कालियुगांत संतांना ओळखणे तसे फार कठीण ! किंबहुना, भाविकांच्या श्रद्धेचा फायदा भोंदू-साधूच जास्त घेत असतांना दिसत असल्याने, खरा साधू-संत ओळखणे कठीण होत आहे. यासाठी संत, त्याच्याकडून मिळणारा गुरुमंत्र त्यांची वाट बघत जीवनांतील महत्त्वाचा वेळवृथा वाया घालविण्यापेक्षा संतांनी कायमरूपी ठेवलेले त्यांचे दासबोध, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत ह्यासारख्या ग्रंथांचे वाचन-मनन करून त्यांतील वचनांचा प्रत्यक्ष जीवनांत-व्यवहारांत उपयोग करून, त्यानुसार शुद्ध आचरण ठेवून, जीवन आनंदात जगणे नि आपल्या संपर्कात येणाऱ्या जीवांसाठी त्याग करायला शिकणे, सेवा-धर्म वाढविणे, सत्यवचनी रहाणे जास्त योग्य ठरेल.

आयुष्यांत संगतीला फारच महत्त्व आहे. ज्याच्याशी आपण संगत करावी, त्याचे गुणधर्म आपल्याला येऊन चिकटतात. प्रवासास पायी निघालेला, बैलगाडीने निघालेला, गाडीने निघालेला तर विमानाने निघालेल्या प्रवाशांपैकी विमानाने गेलेला प्रवासी प्रथम व झट्कन पोहोचतो. तसेच साहेब, डॉक्टर, वकील यांच्याशी लग्न झालेल्या महिलांना साहेबांची पत्नी, डॉक्टरीण बाई, वकीलीणबाई अशी उपाधी विनासायास प्राप्त होते. तसेच ज्या माणसाच्या घरचे जसे अन्न खाव, त्या घरच्या अन्नानुसार वासना बनते. मांस-मच्छी खाल्ल्यास तामसी वृत्ती वाढते तर अन्न शाकाहारी असेल तर त्या भोजनाने सात्विकता सहज प्राप्त होते. म्हणून संतांची देहाने संगत लाभल्यास, त्याच्या घरचे अन्न मुद्दाम मागून खावे. त्यामुळे कित्येक सात्विक गुण अनायासे प्राप्त होतात. संत काय करतात, कसे बोलतात, कसे वागतात यांचे बारीक-हळुवार निरीक्षण करावे म्हणजे त्यानुसार, आपल्या वृत्तींत नेमका कोणता बदल करावयास हवा याचे ज्ञान होते, नि आपल्या वृत्ती नकळत बदलत जातात. संतांच्या बरोबर तीर्थाटनाचा योग आल्यास, संत सांगतील तेवढेच नि तितकेच साधन करावे.

अशावेळी प्रत्यक्ष ईश्वरीशक्ती संतांच्या सन्निध वावरत असल्याने, जरी साधकांस शक्तीचे प्रत्यक्ष दर्शन घडले नाही, तरी शक्तीच्या दृष्टीपथात साधक आल्याने, एक आगळाच आनंद, उत्साह, समाधान लाभते. तसेच अशावेळी दृष्टांत, स्वप्ने याद्वारेही दर्शनलाभ होतो. मात्र, असे दृष्टांत गुरुशिवाय इतरेजनांस बढाई मारून सांगू नयेत. नपेक्षा, वृथा अभिमान होऊन, असे दृष्टांत कायमचेच बंद होऊन, एका अनोख्या, अद्भुत, आनंदास जीवात्मा कायमचाच पारखा होतो. आपला जप, आपली साधना, आपले इष्ट-दैवत गुप्त ठेवावे. कित्येकवेळा त्यांस इतरेजनांची नजर लागून साधनेत खंड पडतो व नैराश्य येते. संतांनी दिलेल्या देवाच्या मंत्राचाच (एकाचाच) जप करावा. संतांच्या नामाचा जप केंव्हाही करू नये. एकाच ठिकाणी तासन्तास मांडी ठोकून केलेल्या जपाने सिद्धी हमखास प्राप्त होतात. त्यामुळे अनेक अशक्य कोटींतील गोष्टी सहज वशही होतात. पण ह्या सिद्धी क्षणभंगूर असून, त्या मोक्ष-मंदिरापर्यंत साधकास पोहोचू देत नाहीत. त्यामुळे कित्येक सिद्धयोगी आपल्याच किर्तीत, पैशांत, वैभवांत कायमचे अडकून बसतात. म्हणून चालता बोलता, गाडीत, एकांतात मनाशीच जप करावा (जप करतांना तोंड हलवू नये) ह्या जपाची मोजदाद करायचीही आवश्यकता नाही. कारण माझा इतका लाख/कोटी जप झाला याचा जीवाला अभिमान निश्चित होतो नि ह्या अभिमानामुळेही देव सोडून मोठेपणांतच जीव पुन्हा रंगून जातो. नि नेमके जे साधायचे ते साध्य बाजूलाच रहाते.

सांप्रत, कली मातला असल्याने, सज्जनांना जास्तीव-जास्त त्रास-ताप होतोय. उलटपक्षी, दुर्जन सहज-मजेत, वैभवांत लोळत असल्याने, त्याचे वैभव पाहून जीवहि दुर्जनाकडे सहज ओढ घेतो. म्हणून अशा क्षणिक, अशाश्वत सुखाच्या मागे न लागता, अत्यंत चिकाटीने, भक्तीने, श्रद्धेने नाम घेऊन शाश्वताचा मार्ग धरणे अत्यावश्यक आहे. संत-संगती घडली तर आनंदच, नपेक्षा संतांचीचरित्रे, ग्रंथ यांचा आधार घ्यावा व संतांनी त्यात सांगितल्यानुसार देवाच्या नामाचीच संगत कायम धरून, नामी व्हावे. म्हणजे, पुढच्या साऱ्या वाटा नि मार्ग आपोआप खुले होतील नि जीवनांतील खरा अत्यानंद, समाधान सुख याचा कायमचा सहवास घडून जीव ब्रह्मानंदी डोलू लागेल.

०००

# “साईंची किमया”



पाच-सहा महिन्यांपूर्वीची गोष्ट आहे. माझे दोन्ही डोळे जरा दुखायचे. त्यापैकी म्हणजे डाव्या डोळ्यातून कधीतरी वेदना व्हायच्या. वेदना क्षणभरच असायच्या. वाटले डोळे तपासणीस डॉक्टरना दाखविले तर बरे होईल. दोन महिने असेच निघून गेले.

जून महिन्यात सांताक्रुझ येथील एका प्रसिद्ध नेत्रतज्ञाकडे डोळे तपासले. त्यांनी सर्व उपचार केले आणि म्हणाले की तुमच्या डाव्या डोळ्यात मोतीबिंदू आहे. ५ महिन्यांनंतर ऑपरेशन करू या आणि उजव्या डोळ्यातदेखील मोतीबिंदू होण्याची शक्यता आहे. एकंदरित त्यांनी माझ्या दोन्ही डोळ्यांस मोतीबिंदू सांगितले. नजर तपासून चष्म्याचा नंबर दिला. दररोज टी.व्ही. पाहताना किंवा बाहेर येता-जाता चष्मा लावण्याचा सल्ला दिला.

मला एकूण काहीच सुचत नव्हते. श्री साईंना म्हटलं, बाबा, असं कसं झालं ? मी तर मधुमेहाने पछाडलेली आहे आणि त्यात डोळ्यांत मोतीबिंदू ऑपरेशन ! पैशापरी पैसा जाणार ! हे असं कसं ? असलं संकट माझ्यावर आणू नका. ठरविलं की गुरुवारपासून ११वा अध्याय वाचायचा. गुरुवारपासून सतत आठ दिवस शांतचित्ताने ११ वा अध्याय वाचला. मधून मधून ११ वा अध्याय वाचायची. पंधरा दिवस झाले, ११ वा अध्याय वाचायचा सोडला नाही. नंतर २० दिवसांनी मी दहिसर येथील नेत्रतज्ञाकडे गेले. पहिल्या डॉक्टरला २०० रु. डोळे तपासण्याची फी दिली होती आणि या डॉक्टरांना १०० रु. फी.

परंतु आश्चर्य म्हणजे या डॉक्टरांनी दोन्ही डोळे तपासले, आणि निष्कर्ष काढला की तुमच्या कुठल्याही डोळ्यात मोतीबिंदू नाही. आणि व्हावयाचीदेखील शक्यता नाही. चष्मानंबर दिला आणि पहिल्या डॉक्टरनी दिलेल्याच सुचना दिल्या.

माझा आनंद गगनात मावेनासा झाला. ही सर्व किमया माझ्या साईंनी केली. गोष्ट साधारण नव्हती. श्री साई थोर आहेत, धन्य आहेत. कलियुगातदेखील आपल्याला तारावयास बाबा सर्व तयारीनिशी पाठीवर आहेत.

**– सौ. वंदना श्री. नलावडे**
मुंबई.

# साईवंदना



## वाट पहाते बायजा...

(चालः झाल्या तिन्ही सांजा...)

झाल्या तिन्ही सांजा, अजून का नाही आला ?
वाट पहाते बायजा, साईनाथ नाही आला ॥धृ॥

शेतवावरातूनं घरधनी घरी आले
लहान-सहान लेकरू ते बी...
मांगते जेवाले SSSS
कसं करू आता बाई....
काही सुचत नाही, वाट पहाते बायजा...॥१॥

येतील म्हणूनी हार गुंफीला बाई
जाई जुई मोगरा, तोडून टाकल्या घाई...
कसं करू आता बाई...
फुल झाडाले नाही... वाट पहाते बायजा...॥२॥

असा कसा हा साई
कुठं बी निंगून जाई
अत्या पत्या ठाव ठिकाणा....
मला गं लागत नाही...
आता कसं करू बाई...
कुणीच सांगत नाही... वाट पहाते बायजा ॥३॥

सारेच म्हणत्यात मला
लागू नगं नादाला...
भाव भक्ती अन् माया
अशी ठेव बाजूला
आता कसं करु बाई...
हे बी पटत नाही... वाट पहाते बायजा ॥४॥

आला ग माझा साई
उंबऱ्यात तो बाई...
'अल्ला मालिक' म्हणूनी
आला ग झोकात शाही
ऊरं माझं आलय भरून...
'अनुसूता' आलंय कळून, वाट पहाते बायजा ॥५॥

■ दीपक उदावंत
नागपूर.